SHIV VANI

# शिव वाणी

सडेतोड आणि परखड विचारांची सत्यवाणी

का.संपादक : वेदांत वैभव स्वामी | संपादक : वैभव विवेक स्वामी

beedshivvani@gmail.com
Mo.9422748792/ 9822628521

L/130/RNP/Renewal/2025-2026

बीड | साप्ताहिक | मराठी | वर्ष २४ वे | अंक-२३ | सोमवार, दि.०८ जून २०२६ | RNI-MAHMAR2003/14666 | किंमत: ३ रू. | पाने : ४

Beed (Maharashtra) | Weekly | MARATHI | Year-24 | Issue -23 | Monday, Dt.08 June 2026 | RNI-MAHMAR2003/14666 | Rupees - 3 Rs | PAGES - 4




# १० जून रोजी भक्तीस्थळ राजूर येथे शिवा वीरशैव लिंगायत गोलमेज परिषद

## जनगणना, अनुभवमंडप आणि बसवेश्वर जयंतीसंदर्भातील महत्त्वाच्या विषयांवर होणार चर्चा

**लातूर । प्रतिनिधी**

**भारतीय जनगणना २०२६-२७ मध्ये वीरशैव-लिंगायत समाजाने धर्म व जातीची नोंद कशी करावी, तसेच महात्मा बसवेश्वरांचा बाराव्या शतकातील मूळ अनुभवमंडप आणि परशूकट्टा मुक्त करून जगभरातील पर्यटकांसाठी खुला करण्याच्या मागणीसंदर्भात पुढील भूमिका निश्चित करण्यासाठी शिवा अखिल भारतीय वीरशैव युवक संघटनेच्या वतीने बुधवार, दि. १० जून २०२६ रोजी वीरशैव लिंगायत गोलमेज परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. ही परिषद लातूर जिल्ह्यातील अहमदपूर तालुक्यातील भक्तीस्थळ राजूर येथे सकाळी ११ ते सायंकाळी ५ या वेळेत पार पडणार आहे.**

शिवा संघटनेचे संस्थापक तथा राष्ट्रीय अध्यक्ष प्रा. मनोहरराव धोंडे यांच्या नेतृत्वाखाली ही परिषद आयोजित करण्यात आली असून, समाजाच्या विविध मूलभूत प्रश्नांवर चर्चा करून महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात येणार आहेत. विशेषतः जनगणना २०२६-२७ मध्ये वीरशैव-लिंगायत समाजाने धर्म आणि जातीची नोंद कोणत्या स्वरूपात करावी, याबाबत एकमताने निर्णय घेण्याचा प्रयत्न या परिषदेत होणार आहे. गेल्या तीन दशकांपासून प्रा. मनोहरराव धोंडे यांच्या नेतृत्वाखाली शिवा अखिल भारतीय वीरशैव युवक संघटना देशभरात तसेच देशाबाहेरील काही भागांमध्ये समाजहिताची विविध कामे करत आहे.



समाजातील अठरापगड जातींना एकत्र घेऊन सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक प्रश्नांवर काम करण्याची संकल्पना संघटनेच्या माध्यमातून राबविण्यात येत आहे. शासन दरबारी समाजाच्या न्याय्य मागण्यांसाठी सातत्याने पाठपुरावा करून अनेक प्रश्न मार्गी लावण्यात संघटनेला यश मिळाल्याचे संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले. परिषदेत बसवकल्याण येथील महात्मा बसवेश्वरांचा बाराव्या शतकातील मूळ अनुभवमंडप आणि त्यांनी न्यायदान केलेला परशूकट्टा मुक्त करून सर्वसामान्यांसाठी खुला करण्याबाबत चर्चा होणार आहे. तसेच क्रांतीसूर्य जगज्ज्योती महात्मा बसवेश्वर महाराज यांची जयंती प्रतिवर्षी अक्षय तृतीयेच्या दिवशी देशभर शासकीय स्तरावर साजरी करण्याच्या मागणीवरही विचारमंथन करण्यात येणार आहे. या मागण्यांसाठी नवी दिल्ली येथील रामलीला मैदानावर धडक मोर्चा काढण्याबाबतही चर्चा करून पुढील दिशा निश्चित केली जाणार आहे. या परिषदेस पंचाचार्य मठ तसेच विरक्त परंपरेतील सुमारे १०० मठाधिपती, २०० शिवकीर्तनकार, प्रवचनकार, गायक-वादक, शिवा संघटनेचे राष्ट्रीय व राज्यस्तरीय पदाधिकारी, साहित्यिक, अभ्यासक आणि समाजातील विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहणार आहेत. एकूण पाचशेहून अधिक प्रतिनिधी परिषदेत सहभागी होऊन विविध विषयांवर चर्चा करतील. महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांतील वीरशैव-लिंगायत समाजातील मठाधिपती, शिवकीर्तनकार, प्रवचनकार, गायक-वादक, साहित्यिक, अभ्यासक, शिवा संघटनेचे ◀◀ पान २ वर

## केंद्र सरकारचे मोठे निर्णय....



### ३९ हजार कोटींचा विकासाचा धडाका, केंद्र सरकारचे मोठे निर्णय जाहीर

**नवी दिल्ली । विशेष प्रतिनिधी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत या आठवड्यात देशाच्या पायाभूत सुविधा, वाहतूक, विमान वाहतूक आणि आर्थिक व्यवस्थेला बळकटी देणारे अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले. सुमारे ३९,२९० कोटींच्या विविध प्रकल्पांना मंजुरी देण्यात आली असून त्यातून रोजगारनिर्मिती, गुंतवणूक वाढ आणि आर्थिक विकासाला गती मिळणार आहे.

### मोदी सरकारचा मास्टरस्ट्रोक! महामार्ग, विमान वाहतूक आणि अर्थव्यवस्थेसाठी मोठी घोषणा

नवी दिल्ली - विमान कंपन्यांवरील इंधन दरवाढीचा भार कमी करण्यासाठी केंद्र सरकारने एव्हिएशन टर्बाइन फ्युएल (-ढ्त्र) किंमत स्थिरीकरण निधी उभारण्याचा निर्णय घेतला आहे. या निधीमुळे विमान वाहतूक क्षेत्राला मोठा दिलासा मिळणार असून प्रवासी सेवांच्या खर्चावर नियंत्रण ठेवण्यास मदत होणार आहे.

### दिल्ली-एनसीआरमध्ये जुन्या वाहनांच्या बदलासाठी योजना

दिल्ली- एनसीआर परिसरातील प्रदूषण कमी करण्यासाठी जुन्या ट्रक, बस आणि व्यावसायिक वाहनांच्या बदलासाठी विशेष योजना मंजूर करण्यात आली आहे. यामुळे पर्यावरण संरक्षणासह आधुनिक आणि इंधन कार्यक्षम वाहनांना प्रोत्साहन मिळणार आहे.

### चार मोठ्या राष्ट्रीय महामार्ग प्रकल्पांना हिरवा कंदील

नवी दिल्ली - केंद्रीय मंत्रिमंडळाने विविध राज्यांतील महत्त्वाच्या राष्ट्रीय महामार्ग प्रकल्पांना मंजुरी दिली आहे. यामध्ये बिहारमधील खगरिया-पूर्णिया मार्ग, तेलंगणातील रस्ते रुंदीकरण, मध्य प्रदेशातील महामार्ग उन्नतीकरण आणि पूर्व किनारपट्टीवरील महत्त्वाकांक्षी किनारी महामार्गाचा समावेश आहे. या प्रकल्पांमुळे मालवाहतूक, पर्यटन आणि औद्योगिक विकासाला चालना मिळेल.

### रामेश्वरम ते पारादीप किनारी महामार्ग

नवी दिल्ली - देशातील सर्वात महत्त्वाकांक्षी प्रकल्पांपैकी एक असलेल्या रामेश्वरम- कोणार्क- पारादीप किनारी महामार्ग प्रकल्पाला मंजुरी देण्यात आली आहे. सुमारे ८,३०१ कोटी खर्चाच्या या प्रकल्पामुळे पूर्व किनारपट्टीवरील संपर्क व्यवस्था मजबूत होणार आहे.

### नवीन उत्पादक किंमत निर्देशांक (पीपीआय)

नवी दिल्ली - केंद्र सरकारने महागाई मोजण्याच्या पद्धतीत मोठा बदल करत प्रोड्युसर प्राइस इंडेक्स (पीपीआय) सुरू करण्याची घोषणा केली आहे. यामध्ये वस्तूंसोबतच बँकिंग, विमा, रेल्वे आणि दूरसंचार यांसारख्या सेवा क्षेत्रांचाही समावेश असेल. त्यामुळे अर्थव्यवस्थेतील किंमत बदलांचे अधिक अचूक विश्लेषण शक्य होणार आहे.

# एसटी स्थानके व बसेसची दर चार तासांनी स्वच्छता-परिवहन मंत्री प्रताप सरनाईक



**मुंबई । प्रतिनिधी**

जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या वतीने राज्यव्यापी अत्याधुनिक स्वच्छता मोहिमेचा शुभारंभ आज मुंबईतील परळ बसस्थानक येथे परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांच्या हस्ते करण्यात आला. या उपक्रमामुळे राज्यातील बसस्थानके, एसटी बसेस, चालक-वाहक विश्रांतीगृहे आणि प्रसाधनगृहे ◀◀ पान २ वर

# इलेक्ट्रॉनिक्स उत्पादन आणि आधुनिक लॉजिस्टिक्स क्षेत्रात महाराष्ट्राची वेगळी ओळख निर्माण करणार-मुख्यमंत्री

## महाराष्ट्रात ४,०८० कोटींची गुंतवणूक, ४,७५० रोजगारांची प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष निर्मिती

**मुंबई । प्रतिनिधी**

**राज्य शासनाला केवळ प्रशासन म्हणून नव्हे, तर तुमचा भागीदार समजा. राज्यात संपूर्ण औद्योगिक परिसंस्था उभी राहावी, ही राज्य शासनाची भूमिका आहे. भारतीय अर्थव्यवस्थेचे शक्तिकेंद्र असलेल्या महाराष्ट्राला इलेक्ट्रॉनिक्स उत्पादन आणि आधुनिक लॉजिस्टिक्स क्षेत्रात देशातील इतर राज्यांपेक्षा वेगळी ओळख निर्माण करण्याची मोठी संधी आहे. त्यामुळे उद्योगांच्या विस्तारासाठी राज्य शासन सर्वतोपरी सहकार्य करेल, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उद्योजकांना दिली.**



मुख्यमंत्री फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत 'वर्षा' निवासस्थानी महाराष्ट्र शासन आणि इलेक्ट्रॉनिक्स उत्पादन क्षेत्रातील आघाडीची जबिल तसेच महाराष्ट्र शासन आणि दुबईस्थित आरएसए ग्लोबल यांच्यात दोन महत्त्वपूर्ण सामंजस्य करार करण्यात आले. या करारांमुळे महाराष्ट्रात ४ हजार ८० कोटी रुपयांची गुंतवणूक होणार असून सुमारे ४ हजार ७५० प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष रोजगारांच्या संधी निर्माण होणार आहेत. उद्योग विभागाचे प्रधान सचिव डॉ. पी. अन्बळगन, उद्योग विकास आयुक्त दीपेंद्रसिंह कुशवाह, जबिलचे ग्लोबल सीईओ माईक दस्तूर, व्यवस्थापकीय संचालक बी. एन. शुक्ला, उपाध्यक्ष देबाशीष चौधरी, संचालक संतोष भगवत तसेच आरएसए ग्लोबलचे अध्यक्ष अजय इंद्रवदन शाह, मुख्य कार्यकारी अधिकारी अभिषेक प्रकाश राव आणि मानव संसाधन प्रमुख मोहन ◀◀ पान २ वर

# शेतकऱ्यांनी खरीप पेरणीपूर्वी बियाण्यांवर बीजप्रक्रिया करावी - जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुभाष साळवे

बीड । प्रतिनिधी

खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर शेतकरी शेतीच्या कामात व्यस्त झाला असून, पेरणीची लगबग सुरू झाली आहे. विविध कीड-रोगांच्या नियंत्रणासाठी प्रतिबंधात्मक उपाय म्हणून बीजप्रक्रिया अत्यंत महत्त्वाची आहे. त्यामुळे यावर्षी खरीप पेरणी करताना शेतकऱ्यांनी बियाण्यांची थेट पेरणी न करता, बीजप्रक्रिया करूनच पेरणी करावी, असे आवाहन बीडचे जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुभाष साळवे यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

बियाणांच्या माध्यमातून किंवा जमिनीतून होणारा कीड-रोगांचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी एकात्मिक व्यवस्थापनात बीजप्रक्रिया हा अत्यंत महत्त्वाचा आणि प्रभावी मार्ग असल्याचेही त्यांनी सांगितले आहे. बियाण्यांना पेरणीपूर्वी औषध किंवा जैविक खतांची प्रक्रिया केल्यास पिकांचे सुरुवातीच्या काळात मोठे संरक्षण होते. पिकनिहाय बियाण्याच्या वजनानुसार बुरशीनाशक, कीटकनाशक आणि जिवाणू खतांचे प्रमाण ठरलेले असते. याबाबतच्या अधिक माहितीसाठी व शिफारसींसाठी जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी आपल्या भागातील सहाय्यक कृषी अधिकारी, उप कृषी अधिकारी, मंडळ कृषी अधिकारी किंवा तालुका कृषी अधिकारी यांच्याशी त्वरित संपर्क साधावा, असे आवाहनही कृषी विभागाकडून करण्यात आले आहे. बीजप्रक्रिया करण्याचे फायदे - बियाणांपासून प्रसारित होणाऱ्या आणि जमिनीत असणाऱ्या बुरशीजन्य रोगापासून संरक्षण मिळते. जमिनीत असणाऱ्या किडींचा तसेच पेरणी पासून ३०-३५ दिवस रस शोषक किडी आणि खोड माशी यांचा प्रादुर्भाव कमी करण्यास मदत होते. कीड व रोग व्यवस्थापनेच्या खर्चात बचत होते. बियाण्याची उगवण क्षमता वाढवते. जैविक खताच्या प्रक्रियेमुळे जिवाणू झाडांना, पिकांना अन्नद्रव्य ◀◀ पान २ वर

# अपघाती मृत्यूचा बनाव नेकनूर पोलिसांनी ३ दिवसात केला उघड

## कोणताही सुगावा नसताना खून प्रकरणाचा उलगडा




**बीड । प्रतिनिधी**

**बीड जिल्ह्यातील नेकनूर पोलीस स्टेशन हद्दीत घडलेल्या एका अत्यंत गंभीर व संवेदनशील प्रकरणाचा अवघ्या ३ दिवसांत उलगडा करण्यात नेकनूर पोलिसांना मोठे यश प्राप्त झाले आहे. विशेष बाब म्हणजे, आरोपींनी हा प्रकार अपघाती मृत्यू असल्याचा बनाव रचून खून लपविण्याचा प्रयत्न केला होता. त्यामुळे सुरुवातीच्या तपासात कोणताही ठोस सुगावा उपलब्ध नव्हता आणि प्रकरण अत्यंत गुंतागुंतीचे बनले होते.**

मयताचा मृतदेह त्याचे वाहनासह रस्त्यालगत आढळून आल्याने प्रथमदर्शनी अपघात झाल्याचे चित्र निर्माण करण्यात आले होते. मात्र घटनास्थळावरील परिस्थिती, उपलब्ध पुरावे आणि शवविच्छेदन अहवालातील निष्कर्ष यामध्ये विसंगती आढळून आल्याने नेकनूर पोलिसांनी तपास अधिक बारकाईने सुरू ठेवला. तांत्रिक विश्लेषण, शास्त्रोक्त तपासपद्धती आणि विविध पुराव्यांची सांगड घालत हा मृत्यू अपघाती नसून खून असल्याचे निष्पन्न झाले. पोलीस अधीक्षक नवनीत कावंत बीड, अपर पोलीस अधीक्षक चेतना तिडके ◀◀ पान २ वर

# बीड एसटी महामंडळात शिकाऊ उमेदवारांची भरती

**बीड । प्रतिनिधी**

**महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बीड विभागीय कार्यालयाअंतर्गत सन २०२६-२७ या सत्रासाठी विविध व्यवसायांमध्ये शिकाऊ उमेदवार निवड प्रक्रियेला सुरुवात झाली आहे. एसटी महामंडळाच्या कार्यशाळेत थेट कामाचा अनुभव मिळविण्याची सुवर्णसंधी बीड जिल्ह्यातील तांत्रिक शिक्षण घेतलेल्या तरुणांना या निमित्ताने मिळणार आहे.**

कौशल्याधारित रोजगाराला चालना देण्यासाठी केंद्र शासनाने तयार केलेल्या अधिकृत एम.आय.एस पोर्टलच्या नियमानुसार ही भरती होत आहे. ही निवड प्रक्रिया प्रथम ऑफलाईन पद्धतीने अर्ज स्वीकारून आणि त्यानंतर ऑनलाईन पद्धतीने राबविण्यात येणार असल्याची माहिती प्रशासनाने दिली आहे. इच्छुक पात्र उमेदवारांनी केंद्र सरकारच्या अधिकृत ApprenticeshipIndia.org या संकेतस्थळाला भेट देऊन माहिती घ्यावी. इंटरनेट किंवा तांत्रिक अडचणी असल्यास उमेदवारांनी थेट विभागीय कार्यालय, राज्य परिवहन महामंडळ, बीड येथे कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा. तसेच अधिक माहितीसाठी महामंडळाच्या ०२४४२-२२२५८० या अधिकृत दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन बीड एसटी विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.









## अग्रलेख....

# धाडसी अधिकारी तुकाराम मुंडे यांची बदली की प्रामाणिकपणाची शिक्षा ?

लोकशाही व्यवस्थेत प्रशासन हे केवळ शासनाच्या आदेशांची अंमलबजावणी करणारे यंत्र नसते, तर ते जनहिताचे रक्षण करणारे एक मजबूत कवच असते. या कवचाला धार देणारे काही मोजके अधिकारी आपल्या प्रामाणिकपणा, कर्तव्यनिष्ठा आणि निर्भीड भूमिकेमुळे जनमानसात वेगळी ओळख निर्माण करतात. अशा अधिकाऱ्यांमध्ये प्रशासकीय अधिकारी तुकाराम मुंडे यांचे नाव अग्रक्रमाने घेतले जाते. मात्र दुर्दैवाने, जनहितासाठी कठोर निर्णय घेणाऱ्या या अधिकाऱ्याला वारंवार बदलीच्या फेऱ्यात अडकवले जाते, ही वस्तुस्थिती आजच्या प्रशासन व्यवस्थेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण करणारी आहे.
तुकाराम मुंडे यांनी ज्या–ज्या ठिकाणी काम केले, तेथे नियमबाह्य कारभार, भ्रष्टाचार, राजकीय हस्तक्षेप आणि प्रशासनातील अनागोंदीला त्यांनी थेट आव्हान दिले. मग ते नागपूर महानगरपालिकेतील आर्थिक शिस्तीचे निर्णय असोत, कोरोना काळातील कठोर प्रशासन असो किंवा शासकीय यंत्रणेतील अनियमिततेवर घेतलेली कारवाई असो–मुंडे यांनी नेहमीच जनहिताला प्राधान्य दिले. परिणामी त्यांना लोकांचा भरभरून पाठिंबा मिळाला, पण त्याचवेळी अनेक स्वार्थी शक्तींचा रोषही ओढवून घेतला.
प्रश्न असा आहे की, जनतेच्या हितासाठी काम करणाऱ्या अधिकाऱ्यांची वारंवार बदली का होते ? एखादा अधिकारी नियमांचे पालन करण्याचा आग्रह धरतो, भ्रष्टाचाराला आळा घालतो, राजकीय दबाव झुगारून निर्णय घेतो, तर त्याची प्रशंसा होण्याऐवजी त्याला बदलीचा फटका का बसतो ? हा प्रश्न केवळ तुकाराम मुंडे यांच्यापुरता मर्यादित नाही तर संपूर्ण प्रशासकीय व्यवस्थेच्या विश्वासार्हतेशी निगडित आहे.
मुंडे यांच्या बदलीनंतर सामाजिक माध्यमांवर, नागरिकांमध्ये आणि विविध संघटनांमध्ये उमटलेल्या प्रतिक्रिया हेच दाखवून देतात की सामान्य नागरिकांना आजही प्रामाणिक अधिकारी हवे आहेत. लोकांनी व्यक्त केलेला संताप हा एखाद्या व्यक्तीवरील प्रेमाचा नव्हे, तर प्रामाणिक प्रशासनाच्या बाजूने उभे राहण्याचा आहे. काम करणाऱ्यांची बदली आणि भ्रष्टांना अभय अशी भावना जनमानसात निर्माण होणे हे कोणत्याही सरकारसाठी धोक्याचे संकेत आहेत.
सरकारने हे समजून घेतले पाहिजे की लोकांचा विश्वास केवळ घोषणा, जाहिराती आणि विकासकामांवर टिकत नाही. तो टिकतो न्याय्य निर्णयांवर आणि प्रामाणिक अधिकाऱ्यांना दिल्या जाणाऱ्या पाठबळावर. जर प्रत्येक वेळी कठोर कारवाई करणाऱ्या अधिकाऱ्यालाच बदलीचा सामना करावा लागणार असेल, तर भविष्यात इतर अधिकारीही धाडसी निर्णय घेण्यापासून कचरतील. याचा थेट परिणाम प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर होईल.
आज गरज आहे ती सरकारने आत्मपरीक्षण करण्याची. तुकाराम मुंडे यांच्यासारख्या अधिकाऱ्यांची बदली हा केवळ प्रशासकीय निर्णय मानून चालणार नाही. या निर्णयामुळे जनतेमध्ये निर्माण झालेल्या असंतोषाचे गांभीर्य ओळखणे आवश्यक आहे. कारण लोकशाहीत अंतिम शक्ती जनतेकडे असते आणि जनतेला प्रामाणिक, निर्भीड आणि जनहितासाठी झटणारे अधिकारी हवे आहेत.
सरकार बदल्या करू शकते, पदे बदलू शकते पण जनतेच्या मनातील विश्वास आणि आदराची बदली करू शकत नाही. तुकाराम मुंडे यांच्या बदलीनंतर उमटलेल्या तीव्र प्रतिक्रिया ही केवळ एका अधिकाऱ्याबद्दलची सहानुभूती नसून, प्रशासनात प्रामाणिकपणा जिवंत राहावा यासाठीची जनभावना आहे. त्या जनभावनेचा आदर करणे हेच सुज्ञ आणि लोकाभिमुख शासनाचे लक्षण ठरेल.

# निर्भय,नि:पक्षपणे व मुक्त वातावरणात निवडणूक होईल याची दक्षता घ्या

## निवडणूक निरीक्षक मिलिंद बोरकर यांचे निर्देश

**बीड । प्रतिनिधी**

**उस्मानाबाद–लातूर–बीड स्थानिक प्राधिकारी मतदारसंघाच्या द्विवार्षिक विधान परिषद निवडणूक २०२६ साठी येत्या १८ जून रोजी मतदान होणार आहे.निवडणूक आचारसंहितेचे काटेकोर पालन करून ही निवडणूक निर्भय, नि:पक्षपणे आणि मुक्त वातावरणात पार पडेल याची दक्षता घ्यावी,असे निर्देश निवडणूक निरीक्षक मिलिंद बोरकर यांनी दिले.**

जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात आज बुधवारी (दि.३) विधान परिषदेच्या स्थानिक प्राधिकारी मतदारसंघ निवडणूक २०२६ च्या तयारीचा आढावा घेण्यासाठी आयोजित बैठकीत ते बोलत होते.यावेळी निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार,जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती.प्रियंवदा म्हाडदळकर,पोलीस अधीक्षक श्रीमती रितू खोखर,अपर जिल्हाधिकारी ज्योती पाटील,जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी नीलेश काळे,निवासी उपजिल्हाधिकारी तथा सहायक निवडणूक निर्णय अधिकारी विद्याचरण कडवकर, उपजिल्हा निवडणूक अधिकारी शिरीष यादव,उपजिल्हाधिकारी प्रवीण धरमकर, संतोष राऊत,श्रीमती. स्वाती शेंडे,श्रीमती. अरुणा गायकवाड,धाराशिव उपविभागीय अधिकारी ओंकार देशमुख, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी हर्षल डाके,जिल्हा माहिती अधिकारी विवेक खडसे,धाराशिव तहसीलदार डॉ.मृणाल जाधव,पोलीस निरीक्षक अमोघ भुजबळ उपस्थित होते.तसेच ऑनलाइन पद्धतीने बीडच्या प्रभारी पोलीस अधीक्षक चेतना तिडके, लातूरचे निवासी उपजिल्हाधिकारी तथा सहायक निवडणूक निर्णय अधिकारी केशव नेटके,बीडचे निवासी उपजिल्हाधिकारी तथा सहायक निवडणूक निर्णय अधिकारी शिवकुमार स्वामी, उपजिल्हा निवडणूक अधिकारी मनोज घोडे सहभागी होते. बैठकीत मार्गदर्शन करताना बोरकर म्हणाले की,राष्ट्रीयकृत बँकांचे अधिकारी या निवडणुकीत सूक्ष्म निरीक्षक म्हणून काम पाहणार आहेत.त्यामुळे तीनही जिल्ह्यांतील सूक्ष्म निरीक्षकांच्या याद्या मागवून घ्याव्यात.मतदान साहित्य वितरण व स्वीकृती केंद्राचे काम योग्य प्रकारे पार पाडावे.मतपेट्या सुरक्षितपणे मतदान केंद्रावर पोहोचविणे तसेच मतदानानंतर सीलबंद मतपेट्यांची वाहतूक कडक सुरक्षा व्यवस्थेत करावी.या प्रक्रियेत कोणतीही उणीव राहणार नाही याची विशेष दक्षता घ्यावी असे ते म्हणाले. मतदान केंद्रावरून मतदान प्रक्रियेची वेळोवेळी माहिती संकलित करण्यात यावी असे सांगून बोरकर म्हणाले की, मतदान प्रक्रियेचे वेबकास्टिंग करण्यात यावे.मतदान केंद्र तहसील कार्यालयात असल्याने दिव्यांग मतदारांच्या सोयीसाठी रॅम्प व व्हीलचेअरची व्यवस्था उपलब्ध असावी,असेही त्यांनी स्पष्ट केले. निवडणूक काळात कोणताही अनुचित प्रकार घडणार नाही याची खबरदारी घ्यावी.आचारसंहितेच्या अंमलबजावणीत दक्ष राहून काम करावे.प्राप्त होणाऱ्या तक्रारींची तात्काळ दखल घ्यावी. निवडणूक प्रक्रिया पूर्णपणे नि:पक्षपाती राहण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांनी जबाबदारीने काम करावे,असेही बोरकर यांनी सांगितले. जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार म्हणाले की,सर्व मतदान पथकांना तीनही टप्प्यांतील प्रशिक्षण व्यवस्थित व परिपूर्ण पद्धतीने देण्यात यावे.तसेच आचारसंहिता भंग होणार नाही याची दक्षता घ्यावी. उपजिल्हा निवडणूक अधिकारी शिरीष यादव यांनी निवडणुकीची माहिती देताना सांगितले की,या निवडणुकीत उस्मानाबाद जिल्हा परिषदेचे ६३ व लातूर जिल्हा परिषदेचे ६९ असे एकूण १३२ मतदार आहेत.लातूर महानगरपालिकेचे ७७ मतदार,बीड जिल्ह्यातील नगरपालिका व नगरपंचायतींचे ३०४,लातूर जिल्ह्यातील नगरपालिका व नगरपंचायतींचे २२१ आणि उस्मानाबाद जिल्ह्यातील नगरपालिका व नगरपंचायतींचे २५४ असे एकूण ७७९ मतदार आहेत. जिल्हा परिषद, महानगरपालिका आणि नगरपालिका/ नगरपंचायतींचे मिळून एकूण ९८८ मतदार या निवडणुकीत मतदानाचा हक्क बजावणार आहेत.बीड जिल्हा परिषदेची निवडणूक झालेली नसल्यामुळे त्या जिल्ह्यातील जिल्हा परिषद सदस्य मतदार म्हणून नसल्याची माहितीही त्यांनी दिली. या बैठकीला लातूर आणि बीड जिल्ह्यांतील निवडणुकीशी संबंधित विविध विभागांचे अधिकारी ऑनलाइन पद्धतीने उपस्थित होते.

## सैनिकी मुलांच्या वसतीगृहासाठी प्रवेश प्रक्रिया सुरू

**बीड । प्रतिनिधी**

**जिल्ह्यातील आजी, माजी सैनिक, युद्ध विधवा आणि विधवांच्या पाल्यांसाठी एक महत्त्वाची बातमी आहे. शैक्षणिक वर्ष २०२६–२७ करीता बीड आणि अंबाजोगाई येथील सैनिकी मुलांचे वसतीगृह आगामी १ जुलै २०२६ पासून पूर्ण क्षमतेने सुरू होत आहे. या वसतीगृहामध्ये प्रवेश मिळविण्यासाठी आता अर्ज प्रक्रिया सुरू करण्यात आली असून, इच्छुकांनी दि.३० जून २०२६ पर्यंत आपले प्रवेश अर्ज सादर करावेत, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी स्कॉड्रन लीडर विद्यासागर कोरडे (नि.) यांनी केले आहे.**

बीड आणि अंबाजोगाई येथे शिक्षण घेणाऱ्या आजी व माजी सैनिकांच्या पाल्यांना या वसतीगृहात प्राधान्याने प्रवेश दिला जातो. पाल्यांच्या पदानुसार अत्यंत अल्प दरात (शुल्क) ही निवासी सोय उपलब्ध करून दिली जाते. विशेष म्हणजे, विधवांच्या मुलांना या वसतीगृहामध्ये पूर्णपणे विनामूल्य प्रवेश दिला जाणार आहे. तसेच जागेच्या उपलब्धतेनुसार इतर नागरिक पाल्यांचाही प्रवेशासाठी विचार केला जातो. प्रवेशासाठी लागणारी प्रवेश पुस्तिका संबंधित वसतीगृह अधीक्षकांकडे उपलब्ध करून देण्यात आली आहे. इच्छुकांनी ही पुस्तिका खरेदी करून आपला प्रवेश दि.३० जूनपूर्वी निश्चित करावा. अधिक माहिती आणि संपर्कासाठी बीड वसतीगृह अधीक्षक ९४२१६१६२२३, अंबाजोगाई वसतीगृह अधीक्षक ९७८०८९७८८३ या क्रमांकावर त्वरित संपर्क साधावा.

# महानगराच्या सर्वांगिण विकासासाठी सर्व यंत्रणांनी समन्वयाने काम करावे -विभागीय आयुक्त जी. श्रीकांत



**छ. संभाजीनगर । प्रतिनिधी**

**छत्रपती संभाजीनगर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (सीएसएमआरडीए) अंतर्गत समाविष्ट गावांचा आणि झालर क्षेत्राचा नियोजनबद्ध, संतुलित, शाश्वत व सर्वसमावेशक विकास करण्यासाठी सर्व शासकीय विभाग, स्थानिक स्वराज्य संस्था आणि संबंधित यंत्रणांनी सक्रिय सहभाग नोंदवून परस्पर समन्वयाने काम करावे, असे निर्देश प्राधिकरणाचे आयुक्त तथा विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी दिले.**

छत्रपती संभाजीनगर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यालयातील सभागृहात आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते. बैठकीस जिल्हाधिकारी विनय गौडा, महानगरपालिका आयुक्त अमोल येडगे, सहआयुक्त अंजली धानोरकर, महानगर नियोजनकार हर्षल बाविस्कर, प्रभारी उपायुक्त सुनंदा पारवे, उपमुख्य लेखा व वित्त अधिकारी साधना बांगर तसेच एमआयडीसी, महसूल, ग्रामविकास व इतर विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. यावेळी विभागीय आयुक्तांनी प्राधिकरण स्थापनेचा मूलभूत उद्देश आणि कार्यपद्धती याबाबत अधिकाऱ्यांना सविस्तर माहिती दिली. छत्रपती संभाजीनगर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या हद्दीत छत्रपती संभाजीनगर, गंगापूर, खुलताबाद, पैठण आणि फुलंब्री या पाच तालुक्यांतील एकूण ३११ गावांचा समावेश असून या संपूर्ण क्षेत्राच्या विकासासाठी विविध विकासकामांना गती देण्याची आवश्यकता त्यांनी अधोरेखित केली.

### नागरिकांना दर्जेदार सुविधा देणे हेच प्रमुख ध्येय

यानंतर झालेल्या सीएसएमआरडीएच्या त्रिस्तरीय उपसमितीच्या बैठकीत विभागीय आयुक्त जी. श्रीकांत, जिल्हाधिकारी विनय गौडा आणि महानगरपालिका आयुक्त अमोल येडगे यांनी प्राधिकरण क्षेत्रातील नागरिकांना दर्जेदार नागरी सुविधा उपलब्ध करून देणे आणि नियोजित विकास साध्य करणे हेच प्राधिकरणाचे प्रमुख उद्दिष्ट असल्याचे सांगितले.

# प्रशासन उद्योजकांच्या पाठीशी, नियोजनबद्ध औद्योगिक विकासासाठी सहकार्याची ग्वाही

## सीआयआयच्या १६ व्या परिषदेत विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांचे आवाहन

**छ. संभाजीनगर । प्रतिनिधी**

**औद्योगिक विकास हा आर्थिक प्रगतीचा आधार असला तरी त्याचबरोबर पर्यावरणाचा समतोल राखणे तितकेच महत्त्वाचे आहे. उद्योग क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक करताना पर्यावरण संवर्धन आणि शाश्वत विकासासाठीही उद्योगांनी योगदान द्यावे, असे आवाहन विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी भारतीय उद्योग महासंघाच्या (सीआयआय) पदाधिकाऱ्यांना केले.**

येथील हॉटेल गेटवेमध्ये आयोजित सीआयआयच्या १६ व्या परिषदेत ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. यावेळी सीआयआयचे श्रीकांत मुंदडा, आरती कुचिभाटला, दीपक गर्ग, पराग सातपुते, नरेंद्र कुलकर्णी, पुष्कर हाते यांच्यासह विविध उद्योग समूहांचे प्रतिनिधी उपस्थित होते. विभागीय आयुक्त जी. श्रीकांत म्हणाले की, काही दशकांपूर्वी बजाज उद्योग समूहाने छत्रपती संभाजीनगरमध्ये औद्योगिक विकासाचा पाया घातला. त्यानंतर शहरात उद्योगांसाठी पोषक वातावरण निर्माण झाले असून देश–विदेशातील नामांकित कंपन्यांनी येथे गुंतवणूक केली आहे. परिणामी मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती झाली असून भविष्यातही रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध होणार आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून राज्यात शाश्वत आणि संतुलित औद्योगिक विकासाला प्रोत्साहन दिले जात आहे. वाढत्या औद्योगिकीकरणामुळे कामगार व नागरिकांसाठी आवश्यक पायाभूत सुविधा उभारण्याचे काम प्रशासनाकडून प्राधान्याने सुरू आहे. उद्योजकांच्या अडचणी सोडविण्यासाठी प्रशासन सदैव तत्पर असून कोणत्याही समाजकंटकांकडून त्रास होत असल्यास उद्योजकांनी थेट व्हॉट्सपद्वारे तक्रार करावी. अशा प्रकरणांमध्ये संबंधितांवर कठोर कारवाई करण्यात येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. टोयोटा, जेएसडब्ल्यूसारख्या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या कंपन्यांनी येथे गुंतवणूक केल्याने शहराची औद्योगिक ओळख अधिक बळकट झाली आहे. भविष्यात आणखी मोठ्या गुंतवणुकीची अपेक्षा असून छत्रपती संभाजीनगर हे देशातील महत्त्वाचे औद्योगिक केंद्र म्हणून उदयास येत असल्याचे मत व्यक्त करण्यात आले. छत्रपती संभाजीनगरला आज इलेक्ट्रिक व्हेईकल कॅपिटल म्हणून नवी ओळख मिळत असून भविष्यात हे शहर देशाच्या औद्योगिक नकाशावर अधिक ठळकपणे झळकेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

# जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी दिली जनगणना प्रगणकाला स्वत:ची माहिती

## सक्रिय सहभागातून करून दिली कर्तव्याची माहिती

**बीड । प्रतिनिधी**

**बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी बुधवार दि. ३ जून २०२६ रोजी आपल्या शासकीय निवासस्थानी आलेल्या जनगणना प्रगणकाला स्वत:ची व कुटुंबाची संपूर्ण माहिती देऊन नोंदणी पूर्ण केली. या औपचारिक नोंदणीसह बीड जिल्ह्यात जनगणनेच्या राष्ट्रीय मोहिमेला गती मिळाली आहे.**



याप्रसंगी बोलताना जिल्हाधिकाऱ्यांनी देशाच्या आणि राज्याच्या सर्वांगीण विकासात जनगणनेचे असलेले अनन्यसाधारण महत्त्व अधोरेखित केले. शासकीय योजनांचे अचूक नियोजन, आखणी आणि प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी जनगणना हा अत्यंत महत्त्वाचा आणि मुख्य आधार आहे. जनगणना ही देशाच्या विकासाचा पाया मानली जाते. लोकसंख्या, शिक्षण, रोजगार, निवास, आरोग्य यासारखी महत्त्वाची माहिती जनगणनेतून मिळते. त्यामुळे प्रत्येक नागरिकाची नोंद होणे हे देशाच्या आर्थिक व सामाजिक प्रगतीसाठी आवश्यक आहे, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी केले.पुढे बोलताना त्यांनी जिल्ह्यातील सर्व नागरिकांना या मोहिमेत सक्रिय सहभागी होण्याचे आवाहन केले. आपल्या घरी येणाऱ्या जनगणना प्रगणकाला कोणतीही भीती किंवा संकोच न बाळगता अचूक, खरी आणि योग्य माहिती देऊन पूर्ण सहकार्य करावे, असेही ते म्हणाले. नागरिकांनी दिलेल्या या सकारात्मक सहकार्यामुळेच ही राष्ट्रीय मोहीम पूर्णपणे यशस्वी होईल, असा दृढ विश्वासही विवेक जॉन्सन यांनी यावेळी व्यक्त केला. याप्रसंगी जनगणनेशी संबंधित प्रगणक, अधिकारी– कर्मचारी उपस्थित होते.

# बीड येथे पहिले कर्मचारी समाधान शिबीर जिल्हाधिकारी जॉन्सन यांच्या मार्गदर्शनात संपन्न

**बीड । प्रतिनिधी**

**शासकीय सेवेतील कार्यरत आणि सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित सेवाविषयक अडचणी आता तातडीने मार्गी लागणार आहेत. विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांच्या संकल्पनेतून संपूर्ण विभागात दर महिन्याच्या पहिल्या शुक्रवारी कर्मचारी समाधान शिबीर आयोजित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तरी बीड येथे पहिले कर्मचारी समाधान शिबीर जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या मार्गदर्शनाखाली उत्साहात पार पडले.**

जून महिन्यातील पहिल्या जिल्हास्तरीय शिबिराचे आयोजन शुक्रवार, दि. ५ जून २०२६ रोजी सकाळी ११ वाजता बीड जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवनात करण्यात आले. यावेळी प्र.निवासी उपजिल्हाधिकारी सोनी, उपजिल्हाधिकारी कैलास सूर्यवंशी, तहसीलदार मेंडके यांची प्रमुख उपस्थिती होती.बीड जिल्ह्यातील सर्व संबंधित अधिकारी- कर्मचारी आणि विविध संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी या शिबिरास उपस्थित राहून आपल्या सेवाविषयक समस्या अर्जाद्वारे सादर कराव्यात, असे आवाहन जिल्हा प्रशासनाकडून यावेळी करण्यात आले. अनेकदा शासकीय कर्मचाऱ्यांना वेतन, पदोन्नती, रजा, निवृत्तीवेतन किंवा सेवापुस्तिका अद्यावत करणे यासारख्या वैयक्तिक व सेवाविषयक कामांसाठी प्रशासकीय कार्यालयात वारंवार जावे लागते. कर्मचाऱ्यांची ही ससेहोलपट थांबविण्यासाठी प्रशासनाने हे अत्यंत महत्त्वाचा पाऊल उचलले आहे. कर्मचारी समाधान शिबीरामुळे कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित तक्रारींचे निवारण होऊन प्रशासकीय कामाला मोठी गती मिळणार आहे. जर महिन्याच्या पहिल्या शुक्रवारी शासकीय सुट्टी आली, तर त्यापूर्वीच्या कामकाजाच्या दिवशी हे शिबीर घेतले जाणार आहे. सर्व संबंधित विभाग प्रमुखांना या सूचनांचे काटेकोर पालन करण्याचे आदेश देण्यात आले असून, कामात दिरंगाई किंवा हलगर्जीपणा करणाऱ्या अधिकाऱ्यांवर थेट जबाबदारी निश्चित केली जाणार आहे.

# बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी पदी डॉ.एम.पी. कोलवाडकर यांची नियुक्ती

**बीड । प्रतिनिधी**

**बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या मा. प्राधिकृत अधिकारी समितीने बँकेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी पदी डॉ.एम.पी. कोलवाडकर यांची नियुक्ती केली आहे.**

सदरील नियुक्तीस रिझर्व्ह बँकेच्या फिट अ‍ॅन्ड प्रॉपर क्रायटेरिया नुसार दिनांक १.६.२०२६ रोजी मान्यता प्राप्त झाली आहे. नवनियुक्त डॉ.एम.पी. कोलवाडकर हे महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेतुन व्यवस्थापक या पदावरुन सेवानिवृत्त झाले असुन त्यांनी राज्य सहकारी बँकेत सुमारे ३४ वर्षे सेवा केलेली आहे. डॉ.एम.पी. कोलवाडकर यांनी बँकीग क्षेत्राातील आय.टी. विभाग, शिखर प्रशिक्षण केंद्राचे प्राचार्य, सीएफए विभागाचे सह व्यवस्थापक व राज्य बँकेच्या नाशिक प्रादेशिक कार्यालयाचे प्रमुख व्यवस्थापक या नात्याने व सन २०२२ मध्ये परसेवेवर अमरावती जिल्हा मध्यवर्ती सहकरी बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणुन कार्यभार सांभाळलेला आहे. प्राधिकृत अधिकारी समितीचे अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी, बीड विवेक जॉन्सन यांनी बँकेचे नुतन मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.एम.पी. कोलवाडकर यांचे स्वागत करुन बँकेच्या प्रगतीसाठी त्यांची भूमिका महत्वाची ठरणार असुन बदलत्या आर्थिक परिस्थितीत बँकेला अधिक सक्षम करण्यास त्यांची मदत होईल असे मनोगत व्यक्त केले व पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या. यावेळी प्राधिकृत अधिकारी समिती सदस्य तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, बीड सतीश तोटावार, समिती सदस्य सतीश पोकळे, समिती सदस्य अ‍ॅड. अशोक कवडे हे उपस्थित होते.

## पान १ वरून....

### १० जून रोजी भक्तीस्थळ राजूर येथे शिवा

पदाधिकारी व समाजबांधवांनी या गोलमेज परिषदेस उपस्थित राहावे, असे आवाहन शिवा अखिल भारतीय वीरशैव युवक संघटनेचे संस्थापक तथा राष्ट्रीय अध्यक्ष प्रा. मनोहरराव धोंडे आणि परिषदेच्या संयोजकांनी केले आहे.

---------

### इलेक्ट्रॉनिक्स उत्पादन

लिमये यावेळी उपस्थित होते. पुण्यात जबिलचा १,५०० कोटींचा विस्तार प्रकल्प.. जबिल कंपनी पुण्यात इलेक्ट्रॉनिक्स मॅन्युफॅक्चरिंग सर्व्हिसेस (ईएमएस) विस्तार प्रकल्प उभारणार आहे. ५जी उपकरणे आणि कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) आधारित नेटवर्किंग स्विचगिअर्सच्या उत्पादनासाठी कंपनी १ हजार ५०० कोटी रुपयांची गुंतवणूक करणार असून त्यातून सुमारे ४ हजार थेट रोजगार निर्माण होणार आहेत. महाराष्ट्रात गेली २३ वर्षे कार्यरत असलेल्या जबिलचे राज्यात १० हजारांहून अधिक कर्मचारी कार्यरत आहेत. कंपनीची नवी अत्याधुनिक उत्पादन सुविधा १७ जून २०२६ रोजी सुरू होणार आहे.

**रायगडमध्ये अल्ट्रा मेगा लॉजिस्टिक्स पार्क...**

महाराष्ट्र शासन आणि आरएसए लॉजिस्टिक्स अँड ट्रान्सपोर्टेशन प्रा. लि. यांच्यात झालेल्या दुसऱ्या सामंजस्य करारानुसार रायगड जिल्ह्यातील उरण येथील जवाहरलाल नेहरू बंदर प्राधिकरण (जेएनपीए) परिसरात २५ हेक्टर क्षेत्रावर अत्याधुनिक 'अल्ट्रा मेगा लॉजिस्टिक्स पार्क' उभारण्यात येणार आहे.

--------------

### एसटी स्थानके व बसेसची दर चार तासांनी

अधिक स्वच्छ, सुंदर व प्रवासी–अनुकूल बनविण्याचा महामंडळाचा संकल्प असल्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी यावेळी सांगितले.

परळ बसस्थानक येथे आयोजित कार्यक्रमात स्वच्छता मोहिमेसाठी उपलब्ध करून देण्यात आलेल्या आधुनिक यंत्रसामग्रीचे प्रात्यक्षिक सादर करण्यात आले. या मोहिमेअंतर्गत राज्यभरातील प्रमुख बसस्थानके आणि त्यांचा परिसर आंतरराष्ट्रीय दर्जाच्या अत्याधुनिक स्वच्छता उपकरणांच्या सहाय्याने नियमितपणे स्वच्छ करण्यात येणार आहे. तसेच एसटी बसेस, चालक–वाहक विश्रांतीगृहे आणि प्रसाधनगृहे यांची दर चार तासांनी स्वच्छता करण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.

**प्लास्टिक पिशव्या व बाटल्यांचे पुनर्वापरासाठी संकलन..**

पर्यावरण दिनाचे औचित्य साधून प्रत्येक बसस्थानकावर स्वच्छता मोहिमेदरम्यान आढळणाऱ्या प्लास्टिकच्या बाटल्या व पिशव्या संकलित करून त्यांचे पुनर्वापर (रिसायकलिंग) करण्यासाठी पाठविण्यात येणार आहे. या प्रक्रियेतून विविध टिकाऊ व उपयुक्त उत्पादने तयार करण्यात येतील, अशी माहिती परिवहन मंत्री सरनाईक यांनी दिली.

**विस्तारित चार्जिंग केंद्राचे भूमिपूजन..**

देशाचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी व राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत एसटी महामंडळाने आपल्या सर्व २५१ आगारांमध्ये ई–बसेससाठी चार्जिंग स्टेशनचे जाळे उभारण्याचा संकल्प केला आहे. त्यानुसार परळ आगारात विस्तारित नऊ चार्जिंग केंद्रांच्या उभारणीचे भूमिपूजन परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांच्या हस्ते करण्यात आले.

-------------

### अपघाती मृत्यूचा बनाव नेकनूर

तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी केज वेंकटराम यांच्या मार्गदर्शनाखाली नेकनूर पोलीस स्टेशनच्या तपास पथकाने रात्रंदिवस अथक परिश्रम घेतले. घटनास्थळावरील पुरावे, साक्षीदारांचे जबाब, मोबाईल कॉल डिटेल रेकॉर्ड (उऊ्र), लोकेशन विश्लेषण, उउढत फुटेज, तांत्रिक माहिती आणि गोपनीय बातमीदारांकडून मिळालेल्या माहितीचे सखोल विश्लेषण करण्यात आले. तपासादरम्यान आरोपींनी पुरावे नष्ट करून तपास दिशाभूल करण्याचा प्रयत्न केल्याचे समोर आले. मात्र पोलिसांनी प्रत्येक धागा तपासून आरोपींच्या हालचालींचा मागोवा घेतला. गोपनीय माहिती व तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे आरोपी फरार झाल्याचे निष्पन्न झाले आणि त्यांचा शोध घेण्यासाठी विशेष पथके रवाना करण्यात आली. या कारवाईत स्थानिक गुन्हे शाखा, बीड, तळोजा पोलीस स्टेशन पनवेल येथील सपोनि निलेश येवले व त्यांचे पथक, टेक्निकल सेलचे विकी सुरवसे तसेच इतर यंत्रणांचे मोलाचे सहकार्य लाभले. संयुक्त प्रयत्नांमुळे आरोपींचा ठावठिकाणा निश्चित करण्यात यश आले व त्यांना तळोजा परिसरातून ताब्यात घेण्यात आले. कोणताही ठोस सुगावा नसताना, आरोपींनी अपघाताचा बनाव रचून खून लपविण्याचा प्रयत्न केलेल्या या गंभीर गुन्ह्याचा अवघ्या ०३ दिवसांत उलगडा करून आरोपींना जेरबंद करण्यात आले, ही नेकनूर पोलिसांची अत्यंत उल्लेखनीय व कौतुकास्पद कामगिरी ठरली आहे. सदरची कामगिरी गुन्ह्याचे तपास अधिकारी व नेकनूर पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी सपोनि मंगेश साळवे यांच्या नेतृत्वात पोलीस स्टेशनचे सफौ. संजय गुंड, पोह/ दत्ता बळवंत, विशाल क्षीरसागर, मन्सूर शेख, गणेश परजने, बाबासाहेब साळुंखे, पोशि बालाजी ढाकणे, सुधाकर जायभाये यांनी पार पाडली.

------------

### शेतकऱ्यांनी खरीप पेरणीपूर्वी

लवकर उपलब्ध करून देतात, त्यामुळे झांडाची, पिकांची वाढ जोमाने होते. बीजप्रक्रिया करतेवेळी घ्यावयाची काळजी – बीजप्रक्रिया करण्यासाठी हातमोजे, मारक, चष्मा या सारख्या व इतर संरक्षण करणाऱ्या बाबीचा वापर करावा. बीजप्रक्रिया तळवटावर किंवा बारदाण्यार किंवा सीड ड्रम, यंत्राद्वारे सावलीत करावी. बियाणे हाताने चोळू नये, कापडाने किंवा पिशवीमध्ये एकत्र मिसळून घ्यावे. रासायनिक आणि जैविक बीजप्रक्रिया एकत्र करू नयेत. विकत घेतलेल्या बियाण्यांवर बुरशीनाशक आणि कीटकनाशकांची बीजप्रक्रिया केली असल्यास अशा बियाण्यांवर फक्त जिवाणू खतांची बीजप्रक्रिया करावी. बीजप्रक्रियेचा क्रम असा असावा, प्रथम रासायनिक बुरशीनाशक, त्यानंतर रासायनिक कीटकनाशक व त्यानंतर ३ ते ४ तासांनी जैविक बुरशीनाशक व जैविक कीटकनाशके त्यानंतर ३ ते ४ तासांनी रायझोबिअम किया अ‍ॅझोटोबैक्टर (जिवाणू संवर्धक) सर्वात शेवटी केएमबी किवा पीएसबी (जिवाणू संवर्धक) यांची बीजप्रक्रिया करावी. नैसर्गिक शेतीचा अवलंब करत असताना फक्त बीजामृताचीच बीजप्रक्रिया करावयाची आहे. नैसर्गिक शेती करताना रासायनिक बुरशीनाशक, रा. कीटकनाशक व जैविक बुरशीनाशक व जै. किटकनाशके व जिवाणू संवर्धक यांची बीजप्रक्रिया करु नये असेही कळविले आहे.

## महाराष्ट्र शासनाचे महत्त्वपूर्ण निर्णय...



### कर्जमाफी, रस्ते विकास, गुंतवणूक आणि प्रशासनिक सुधारणांचे ऐतिहासिक निर्णय

मुंबई । विशेष प्रतिनिधी

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत या आठवड्यात राज्याच्या कृषी, पायाभूत सुविधा, उद्योग, गुंतवणूक आणि प्रशासन क्षेत्राशी संबंधित अनेक महत्त्वपूर्ण निर्णयांना मंजुरी देण्यात आली. या निर्णयांमुळे लाखो शेतकरी, उद्योग क्षेत्र आणि सर्वसामान्य नागरिकांना दिलासा मिळणार असून राज्याच्या विकासाला नवी गती मिळणार असल्याचा दावा सरकारने केला आहे.

### शेतकऱ्यांसाठी ३६,५८५ कोटींची कर्जमाफी

मुंबई – राज्य मंत्रिमंडळाने 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना' मंजूर केली आहे. या योजनेअंतर्गत पात्र शेतकऱ्यांना दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमाफीचा लाभ मिळणार असून सुमारे ५६ लाख शेतकरी लाभार्थी ठरणार आहेत. नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांसाठी प्रोत्साहनपर तरतूदही करण्यात आली आहे.

### १७,४०० कोटींच्या रस्ते विकास प्रकल्पांना मंजुरी

मुंबई – राज्यभरातील रस्ते आणि दळणवळण व्यवस्था मजबूत करण्यासाठी हजारो कोटी रुपयांच्या रस्ते विकास प्रकल्पांना हिरवा कंदील देण्यात आला आहे. या प्रकल्पांमुळे ग्रामीण व शहरी भागातील संपर्क व्यवस्था सुधारण्यास मदत होणार आहे.

### उद्योग गुंतवणुकीसाठी स्वतंत्र प्रोत्साहन संस्था

मुंबई – राज्यात देशी-विदेशी गुंतवणूक वाढविण्यासाठी महाराष्ट्र सरकारने ३,००० कोटींच्या तरतुदीसह स्वतंत्र गुंतवणूक प्रोत्साहन संस्था स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. उद्योगांना एकाच खिडकीतून परवानग्या आणि सहाय्य उपलब्ध करून देण्याचा या संस्थेचा उद्देश आहे.

### जमीन व्यवहारांना वेग

मुंबई – राज्य शासनाने महसूल प्रशासन अधिक गतिमान करण्यासाठी नझूल आणि शासकीय जमिनींच्या व्यवहारांबाबतचे अनेक अधिकार जिल्हाधिकारी आणि विभागीय आयुक्तांना प्रदान केले आहेत. त्यामुळे प्रलंबित प्रस्तावांचा निपटारा जलद गतीने होण्याची अपेक्षा आहे.

### मुंबईतील एअर इंडिया इमारत राज्याच्या ताब्यात

मुंबई – नरिमन पॉईंट येथील प्रतिष्ठित एअर इंडिया भवन अधिकृतपणे महाराष्ट्र शासनाच्या ताब्यात आले आहे. राज्य प्रशासनासाठी या जागेचा भविष्यात महत्त्वपूर्ण उपयोग होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

### रोजगार आणि उद्योग वृद्धीवर भर

मुंबई – राज्यात मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी उद्योगस्नेही धोरणे, पायाभूत सुविधा विकास आणि रोजगारनिर्मितीला चालना देण्यावर सरकारचा भर असल्याचे मंत्रिमंडळ बैठकीनंतर स्पष्ट झाले आहे.

# बीडमध्ये ऊसतोड कामगारांच्या 'स्थलांतर पूर्व नियोजन' बैठकीत महत्त्वपूर्ण निर्णय

## कामगारांसाठी स्वतंत्र ओळखपत्रे, आरोग्य शिबिरे, जन्मदाखले व योजनांचा लाभ मिळवून देण्यावर भर

बीड । प्रतिनिधी

**ऊसतोड कामगार आणि त्यांच्या कुटुंबीयांच्या विविध समस्या सोडविण्यासाठी प्रशासन व स्वयंसेवी संस्थांनी समन्वयाने काम करण्याची गरज असून, कामगारांच्या सुविधेसाठी तातडीने नवीन कार्यपद्धती (एसओपी) तयार करून लोकनेते गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळाच्या माध्यमातून ओळखपत्रांचे वितरण करण्यात यावे, असे निर्देश जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी दिले.**

मराठवाडा ग्रामीण विकास संस्था संचलित ऊसतोड कामगार प्रकल्पांतर्गत जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित जिल्हास्तरीय 'स्थलांतर पूर्व नियोजन' समन्वय बैठकीत ते अध्यक्षस्थानावरून बोलत होते. यावेळी जिल्हा



परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जतीन रहमान, सहाय्यक समाज कल्याण आयुक्त भोगले, जिल्हा आरोग्य अधिकारी गंडाळ, शिक्षणाधिकारी, महिला व बालविकास अधिकारी, सहाय्यक कामगार आयुक्त, ऊसतोड कामगार कृती समितीचे बाजीराव ढाकणे यांच्यासह विविध स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी आणि मराठवाडा ग्रामीण विकास संस्थेचे पदाधिकारी उपस्थित होते. बैठकीत ऊसतोड कामगारांचे स्थलांतर, आरोग्य, शिक्षण, पोषण, सार्वजनिक वितरण व्यवस्था आणि सामाजिक सुरक्षा या विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. कामगारांचा डेटा ज्या जिल्ह्यात किंवा राज्यात ते स्थलांतरित होतात, त्या प्रशासनाशी सामायिक करण्याचा महत्त्वपूर्ण प्रस्ताव मांडण्यात आला. यामुळे स्थलांतरित कामगारांना तेथील शासकीय योजनांचा लाभ अधिक प्रभावीपणे मिळू शकेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला. ऊसतोड कामगारांच्या समस्या आणि तक्रारींचे निराकरण करण्यासाठी सुरू करण्यात आलेल्या १८००२३३१२१२ या टोल फ्री हेल्पलाइन क्रमांकाची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या सूचना देण्यात आल्या. तसेच लोकनेते गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळाच्या विविध योजनांची गावागावांत व्यापक जनजागृती करण्याचे निर्देश समाज कल्याण विभागाला देण्यात आले. बैठकीच्या प्रारंभी जिल्हा संपर्क अधिकारी एच. पी. देशमुख यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. एमआयएस अधिकारी अनुप मोरे यांनी ऊसतोड कामगारांसमोरील समस्या, आव्हाने आणि संभाव्य उपाययोजनांवर सविस्तर सादरीकरण केले. तर अश्वजीत जाधव यांनी आभार प्रदर्शन केले. यावेळी बाजीराव ढाकणे, विशाल झीन्जूर्डे, राहुल घनघाव, ओमप्रकाश गिरी, मनीषा तोकले आदींनी ऊसतोड कामगारांच्या विविध समस्या प्रशासनासमोर मांडल्या. प्रशासन आणि स्वयंसेवी संस्थांनी एकत्रितपणे काम करून ऊसतोड कामगारांचे प्रश्न प्राधान्याने सोडवावेत, असे आवाहन जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी बैठकीच्या शेवटी केले.

# बीड सायबर पोलीसांनी फसवणुक झालेली संपूर्ण रक्कम तक्रारदारास परत मिळवुन दिली



बीड । प्रतिनिधी

**सायबर पोलीस ठाणे बीड येथे ऑनलाईन फसवणुक गु.र.नं. ३१/२०२५ कलम ३१८(४)३(५) बी.एन.एस. सह कलम ६६,६६ (क) आय.टी. ॲक्ट २००० अन्वये गुन्हा दाखल होता.यामध्ये तक्रारदार यांचे मोबाईल व सिमकार्डचा वापर करुन आरोपींनी तक्रारदार नामे मिनाक्षी दत्ता आंधळे रा हिंगणी ता.जि.बीड यांचे बँक खात्यावरील १,३३,९९५/-रु फसवणूक करुन काढून घेतली होती.**

तक्रारदाराने केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने सायबर पोलीसांनी तांत्रीक विश्लेषण व बँकेकडून प्राप्त माहिती वरुन आरोपींचा शोध घेण्यात आला. या तपासातुन फसवणुक करणा-या आरोपीकडुन ८९,०००/-रु जप्त करण्यात आले. तसेच सदर गुन्ह्यातिल मुख्य आरोपीचा शोध पुणे, अहील्यानगर धाराशिव इत्यादी जिल्ह्यात घेतला असता मिळुन आला नाही. दिनांक ०२/०६/२०२६ रोजी मुख्य आरोपीची माहीती टेक्नीकल सेल विभाग बीड यांच्याकडुन तांत्रीक पध्दतीने प्राप्त होताच मुख्य आरोपीनामे श्रीकृष्ण गोवर्धन आंधळे रा. हिंगणी ता.जि. बीड यास चौसाळा ता.जि. बीड येथे ताब्यात घेण्यात आले. सदर आरोपीने गुन्हा केल्याचे कबुल दिली. फसवणुक झालेल्या रक्कमेपैकी उर्वरीत रक्कम ४५०००/- रुपये आरोपीकडून जप्त करण्यात आले, सदर आरोपीस मा. न्यायालयात हजर केले असता मा. न्यायालयाने १४ दिवस न्यायालयीन कोठडी मंजुर केली. नमुद आरोपीस जिल्हा कारागृह, बीड येथे जेलबंद करण्यात आले. हि कारवाई पोलीस अधीक्षक बीड, अपर पोलीस अधीक्षक बीड, उपविभागीय पोलीस आधिकारी बीड यांचे मार्गदर्शनाखाली सायबर पोलीस ठाणे बीड चे पो नि. निलेश केळे, सहा. पोउपनि, भारत जायभाये, पोह विजय घोडके, पो. अं.निलेश उगलमुगले, पो.अं. अंकुश तोटेवाड यांच्या पथकाने केली.

# चौसाळा येथे डिझेल चोरट्यांचा पाठलाग करत पोलिसांनी ठोकल्या बेड्या..!

## नेकनूर पोलिसांची धडाकेबाज कारवाई,लाखोच्या मुद्देमाल जप्त, पाच ताब्यात पो, हे, रामनाथ पुंडे व पो, हे, विलास घुले यांची धडाकेबाज कारवाई

चौसाळा । प्रतिनिधी

**राज्यात इंधन तुटवड्याच्या पार्श्वभूमीवर डिझेलचा काळाबाजार व चोरीच्या घटना वाढत असताना चौसाळा पोलिसांनी धडाकेबाज कारवाई करत डिझेल चोरी करणाऱ्या पाच जणांच्या टोळीचा पहाटे थरारक पाठलाग करून ताब्यात घेतले. या कारवाईत लाखो रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.**



इराण-इराक व अमेरिका यांच्यातील युद्धजन्य परिस्थितीमुळे इंधन पुरवठ्यावर परिणाम होत असल्याने राज्यात इंधन तुटवड्याची शक्यता निर्माण झाली आहे. याच पार्श्वभूमीवर काहीजण इंधनाचा साठा करत असल्याचे चित्र आहे. दरम्यान, पाच जणांच्या टोळीने डिझेल चोरीचा मार्ग अवलंबल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. गुप्त माहितीच्या आधारे दिनांक २ जून मंगळवार रोजी पहाटे चौसाळा बायपास परिसरात पहाटेच्या सुमारास पोलिसांनी सापळा रचला. ही कारवाई पोलीस निरीक्षक साबळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हेडकॉन्स्टेबल रामनाथ पुंडे व पोलीस शिपाई विलास घुले यांनी संशयित वाहनाचा पाठलाग केला. काही अंतरापर्यंत थरारक पाठलाग केल्यानंतर पोलिसांनी पाचही आरोपींना ताब्यात घेण्यात यश मिळवले.या कारवाईत चोरीसाठी वापरण्यात येणारे साहित्य तसेच लाखो रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. पुढील तपास चौसाळा पोलीस करत आहेत.



# पर्यावरण दिनानिमित्त सुखना नदी काठावर वृक्षरोपण

छ. संभाजीनगर । प्रतिनिधी

**जागतिक पर्यावरण दिनानिमित्त सुखना नदीच्या काठावर आज वृक्षरोपण करण्यात आले. यावेळी भारतीय वंशाच्या अडीच हजारांहून अधिक वृक्षरोपांचे रोपण करण्यात आले.**

यावेळी महापौर समीर राजूरकर,आमदार अनुराधा चव्हाण, विभागीय आयुक्त जी श्रीकांत, जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी., महानगरपालिका आयुक्त अमोल येडगे, अतिरिक्त आयुक्त कल्पिता पिंपळे, उपआयुक्त नंदकिशोर भोंबे, विकास नवाळे, शहर अभियंता संजय कोंबडे, अपर्णा थेटे, उद्यान अधीक्षक विजय पाटील, मुख्य लेखा अधिकारी संतोष वाहुळे आदी उपस्थित होते. पर्यावरण संवर्धन आणि हरित शहर निर्मितीच्या उद्देशाने आयोजित या उपक्रमात नागरिकांनीही उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

# अप्पावाडी येथे संत शिरोमणी श्रीमन्मथ स्वामी व सद्गुरू पंचाक्षर शिवाचार्य दर्शनार्थ मूर्तींचे अनावरण उत्साहात

छ. संभाजीनगर । प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर येथील अप्पावाडी परिसरातील श्रीमन्मथधाम ध्यान मंदिर, श्री पंचाक्षर तपोवन संस्थान येथे ज्येष्ठ अधिक मासानिमित्त आयोजित धार्मिक सोहळ्यात जगद्गुरु डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी यांच्या अमृतहस्ते संत शिरोमणी श्रीमन्मथ स्वामी तथा सद्गुरू पंचाक्षर शिवाचार्य यांच्या दर्शनार्थ मूर्तींचे अनावरण मोठ्या उत्साहात व भक्तिमय वातावरणात संपन्न झाले. दि. ३ जून २०२६ रोजी झालेल्या या सोहळ्यास भाविकांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती लाभली.**





कार्यक्रमाची सुरुवात भव्य ग्रंथदिंडी मिरवणुकीने झाली. धार्मिक घोषणांनी परिसर दुमदुमून गेला होता. यानंतर आयोजित धर्मसभेत जगद्गुरु श्रीमद् काशी महास्वामीजी यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना ज्येष्ठ अधिक मासाचे धार्मिक महत्त्व, कर्तव्यकर्म, जप-तप, दानधर्म आणि उपासना पद्धती यांवर सखोल विवेचन केले. त्यांनी अधिक मास हा आत्मशुद्धी, साधना आणि धर्मकार्यांसाठी अत्यंत महत्त्वाचा कालखंड असल्याचे सांगितले. यावेळी डॉ. विरूपाक्ष शिवाचार्य महाराज यांनी श्रीक्षेत्र मन्मथधाम जंगममठ संस्थानच्या २३ वर्षांच्या कार्याचा आढावा घेतला. ग्रामीण भागातील भाविकांना धर्मकार्य व अध्यात्मिक मार्गदर्शन उपलब्ध व्हावे या उद्देशाने अप्पावाडी येथे महातपस्वी ब्रह्मश्री १०८ सद्गुरू पंचाक्षर शिवाचार्य आणि संत शिरोमणी श्रीमन्मथ स्वामी यांच्या मूर्तींची स्थापना करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. अनेक दिवसांपासून भाविक या दर्शनासाठी उत्सुक होते, त्यामुळे त्यांची इच्छा पूर्ण करण्यासाठी हा सोहळा आयोजित करण्यात आल्याचेही त्यांनी नमूद केले. जगद्गुरु डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी यांनी उपस्थित भक्तांना मंगलाशीर्वाद देत धर्म, संस्कार आणि समाजएकतेचा संदेश दिला. पुढील धार्मिक कार्यक्रमांसाठी नगर व नाशिक येथे प्रस्थान करावयाचे असतानाही त्यांनी भाविकांशी संवाद साधून आशीर्वाद प्रदान केले. या धार्मिक सोहळ्यास अप्पावाडी, शरणापूर, दौलताबाद, आब्दीमंडी, बजाजनगर, जालना शहर तसेच परिसरातील ग्रामीण भागातील वीरशैव लिंगायत समाजाचे मोठ्या संख्येने उपस्थिती होती. यामध्ये लक्ष्मण आप्पा लिंभारे, श्रीकांत आप्पा सदावर्ते, महालिंग आप्पा सदावर्ते (सरपंच), नारायण आप्पा लिंभारे, सुरेश आप्पा चुनुके, कांतेश्वर आप्पा लिंभारे, ईश्वर आप्पा लिंभारे, मधुकर आप्पा लिंभारे, रत्नाकर आप्पा लिंभारे, देविदास आप्पा लिंभारे, विनोद आप्पा लिंभारे, राम आप्पा लिंभारे, निलेश आप्पा लिंभारे, सचिन आप्पा लिंभारे, जगदीश आप्पा लिंभारे, महेश आप्पा व्यवहारे, कबाडे आप्पा यांच्यासह महिला मंडळींचीही लक्षणीय उपस्थिती होती. धार्मिक श्रद्धा, अध्यात्मिक वातावरण आणि समाजातील एकजूट यांचे दर्शन घडविणारा हा सोहळा भक्तांच्या स्मरणात राहील, अशी भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

# जिवंतपणी आधार नाही, पण मृत्यूनंतर माणुसकीने दिला खांदा..!

## दोन बेवारस जीवांना समाजसेवकांनी कुटुंबीयांसारखा दिला अखेरचा निरोप; बीडमध्ये मानवतेचे हृदयस्पर्शी दर्शन

बीड । प्रतिनिधी

**माणूस मेला की त्याच्यासोबत सर्व संपते असे म्हटले जाते. पण काही माणसे अशी असतात की, ती स्वतःच्या कृतीतून माणुसकी अजूनही जिवंत असल्याचा विश्वास समाजाला देत असतात. बीड शहरात घडलेली अशीच एक हृदयस्पर्शी घटना समाजाच्या संवेदनांना साद घालणारी ठरली आहे. जिवंतपणी ज्यांना आधार देण्यासाठी कोणी नव्हते, अशा दोन बेवारस व्यक्तींना मृत्यूनंतर मात्र समाजसेवकांनी कुटुंबीयांप्रमाणे खांदा देत सन्मानाने अखेरचा निरोप दिला.**

आजच्या धावपळीच्या, स्वार्थी आणि भौतिक सुखांच्या मागे धावणाऱ्या समाजात नाती, माणुसकी आणि सामाजिक बांधिलकी यांचे महत्त्व कमी होत असल्याची खंत अनेकदा व्यक्त केली जाते. अशा काळात बीडमधील काही समाजसेवकांनी केलेल्या या कार्याने समाजासमोर एक जिवंत आदर्श उभा केला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, चकलंबा परिसरातील एक निराधार महिला भीक मागून आपला उदरनिर्वाह करत होती. प्रकृती गंभीर झाल्यानंतर तिला उपचारासाठी बीड येथे दाखल करण्यात आले होते. मात्र उपचार सुरू असतानाच तिचे निधन झाले. तिच्या मृत्यूनंतर अंत्यसंस्कारासाठी



एकही नातेवाईक अथवा ओळखीची व्यक्ती पुढे आली नाही. त्यामुळे तिचा मृतदेह बेवारस अवस्थेत पडून होता. याच दिवशी नेकनूर परिसरातील एका वृद्ध व्यक्तीचेही निधन झाले. त्यांच्या अंत्यसंस्कारासाठीही कोणीच पुढे आले नाही. आयुष्यभर संघर्ष करत जगलेल्या या दोघा जीवांचा शेवटही एकाकीपणात होणार, असे चित्र निर्माण झाले होते. मात्र ही बाब समोर येताच बीडमधील समाजसेवकांनी तात्काळ पुढाकार घेतला. या दोघांनाही आपल्या कुटुंबातील सदस्य समजून त्यांच्या अंत्यसंस्काराची संपूर्ण जबाबदारी स्वीकारली. धार्मिक विधी, सन्मानपूर्वक अंत्ययात्रा आणि सर्व आवश्यक प्रक्रिया पूर्ण करून त्यांना अखेरचा निरोप देण्यात आला. अंत्यसंस्कारावेळी उपस्थित असलेल्या अनेकांच्या डोळ्यांत अश्रू तरळले होते. जिवंतपणी ज्यांच्या आयुष्यात आपुलकीचा हात कमी पडला, त्यांना मृत्यूनंतर तरी सन्मान मिळावा, या भावनेतून समाजसेवकांनी केलेले हे कार्य प्रत्येक संवेदनशील मनाला अंतर्मुख करणारे होते. ही घटना केवळ दोन बेवारस व्यक्तींच्या अंत्यसंस्कारापुरती मर्यादित नाही. ती आजच्या समाजाला एक गंभीर प्रश्न विचारते-आपल्या आजूबाजूला असे किती लोक आहेत, जे जिवंतपणीच समाजापासून तुटलेले आहेत ? वृद्धापकाळ, गरिबी, एकटेपणा आणि सामाजिक उपेक्षा यामुळे अनेकांचे जीवन अक्षरशः बेवारस होत चालले आहे. अशा वेळी शासन, प्रशासन आणि समाज या तिन्ही घटकांनी अधिक संवेदनशील होण्याची गरज अधोरेखित होते. या अंत्यविधीसाठी पोलीस प्रशासनानेही आवश्यक सहकार्य केले. पोलीस आणि समाजसेवकांच्या संयुक्त प्रयत्नातून पार पडलेला हा अंत्यविधी सामाजिक बांधिलकीचे एक प्रेरणादायी उदाहरण ठरला. आज समाजात नात्यांची व्याख्या बदलत असताना या समाजसेवकांनी रक्ताच्या नात्यांपेक्षाही माणुसकीचे नाते मोठे असते, हे आपल्या कृतीतून दाखवून दिले आहे.

### अंतर्मुख करणारा प्रश्न...

जिवंत असताना ज्यांना दोन आधाराचे शब्द मिळाले नाहीत, त्यांना मृत्यूनंतर अनोळखी लोकांनी खांदा दिला. ही घटना समाजातील संवेदनशील माणसांचा अभिमान वाढवणारी असली, तरी आपल्या सामाजिक व्यवस्थेचे आत्मपरीक्षण करायला भाग पाडणारीदेखील आहे. कारण माणुसकी जिवंत असल्याचा आनंद आहेच; पण माणसांना बेवारस होण्याची वेळ का येते, याचे उत्तर शोधणे त्याहून अधिक गरजेचे आहे.

### अंत्यविधीसाठी यांनी घेतला पुढाकार..

या कार्यात समाजसेवक राजू वंजारे, अभिजीत वैद्य, पत्रकार वैभव स्वामी, राजूभाऊ गुळभिले, विजय पंडित, डॉ. संजय तांदळे, गणेश माने, छाया सरोदे, किरण डोळस, सारिका गायकवाड आणि यश वंजारे यांनी सक्रिय सहभाग घेतला.

### बेवारस व्यक्तींच्या अंत्यविधीसाठी सदैव तत्पर – वैभव स्वामी

जिव्हाळा बेघर निवारा केंद्रासह ज्याही बेवारस व्यक्तींचा मृत्यू होईल त्यांच्या अंत्यविधीसाठी पत्रकार संघ कायम तत्पर राहून पुढाकार घेईल, असे श्रद्धांजली पर मनोगत व्यक्त करताना पत्रकार वैभव स्वामी यांनी मत व्यक्त केले.

### असंवेदनशील प्रशासन.... अन् ताटकळले मृतदेह..!

गेवराई तालुक्यातील चकलांबा हद्दीतील एका बेवारस मृत्यू पावलेल्या वयोवृद्ध मातेचा पोलीस कॉन्स्टेबल सकाळी नऊ वाजता जिल्हा रुग्णालयातील पोस्टमार्टम विभागात अंत्यविधीसाठी मृतदेह ताब्यात घेण्यासाठी थांबले होते. रखरखत्या उन्हात तब्बल चार तासानंतर पोस्टमार्टम करून साडेबारा वाजता मृतदेह ताब्यात देण्यात आला. सकाळी अकरा वाजल्यापासून बीड नगरपालिकेच्या सत्ताधारी आणि प्रशासकीय यंत्रणेला सांगितलेले असताना सुद्धा बिंदुसरा नदीच्या पात्रामध्ये अंत्यविधी साठी खड्डा करण्यास जेसीपी तब्बल चार तास आला नाही. त्यामुळे भर उन्हात दोन्ही बेवारस मृतदेह ठेवण्याची वेळ सामाजिक कार्यकर्त्यांवर आली. मृत्यूनंतरही त्या बेवारस मृतदेहाची आवेहलना होऊ नये म्हणून सामाजिक कार्यकर्त्यांनी पुढाकार घेऊन सदरील अंत्यविधी केला.मात्र भविष्यात अशी अवहेलना प्रशासकीय यंत्रणे कडून होऊ नये याची दखल घेणे गरजेचे आहे.

cmyk

शिव वाणी
SHIV VANI
क्रीडा, न्यायनिवाडा, क्राईम घडामोडी...
सोमवार, दि.०८ जून २०२६
Monday, Dt. 08 June 2026

## क्रीडा विश्वातील ताज्या घडामोडी...




### फ्रेंच ओपनमध्ये अलेक्झांडर झ्वेरेव्ह अंतिम फेरीत

फ्रेंच – यंदाच्या फ्रेंच ओपनमध्ये जर्मनीच्या अलेक्झांडर झ्वेरेव याने उपांत्य फेरीत उत्कृष्ट खेळ करत अंतिम फेरीत धडक मारली. झ्वेरेव्हने युवा खेळाडू याकुब मेन्सिकचा पराभव करत कारकिर्दीतील आणखी एका ग्रँडस्लॅम अंतिम फेरीत प्रवेश केला. आता त्याच्यासमोर पहिले ग्रँडस्लॅम विजेतेपद मिळविण्याचे मोठे आव्हान आहे.



### विश्वचषकासाठी फुटबॉल महासत्तांची जोरदार तयारी

इंग्लंड – फुटबॉल विश्वचषकाच्या पार्श्वभूमीवर इंग्लंडसह अनेक संघांनी सराव सामने आणि प्रशिक्षण शिबिरे सुरू केली आहेत. इंग्लंडचे प्रशिक्षक थॉमस रुचेल यांनी कर्णधार हॅरी केन विश्वचषकासाठी पूर्णपणे सज्ज असल्याचा विश्वास व्यक्त केला आहे. एकूणच मागील आठवड्यात फ्रेंच ओपनमधील अनपेक्षित निकाल, कसोटी क्रिकेटच्या अस्तित्वावरील प्रश्न आणि विश्वचषकाच्या तयारीने क्रीडा विश्व गाजले. आगामी दिवसांत फ्रेंच ओपनचे विजेते कोण ठरणार आणि फुटबॉल विश्वचषकात कोणता संघ बाजी मारणार याकडे आता संपूर्ण जगाचे लक्ष लागले आहे.

### फ्लाव्हिओ कोबोलीचा अनपेक्षित उदय

इटली – युवा स्टार फ्लेव्हिओ कोबोली फ्रेंच ओपनच्या अंतिम फेरीत पोहोचला. उपांत्य फेरीतील प्रतिस्पर्धी मॅटिओ अर्नाल्डी आजारी पडल्याने त्याला वॉकओव्हर मिळाला. त्यामुळे फ्रेंच ओपनमध्ये नव्या चेहऱ्याचा उदय झाल्याची चर्चा रंगली आहे.

### महिला गटात माजा च्वालिन्स्काचा चमत्कार

पोलंड – महिला गटात पोलंडची माजा क्वॉलिन्स्का ही पात्रता फेरीतून आलेली खेळाडू अंतिम फेरीत पोहोचून सर्वांचे लक्ष वेधून घेत आहे. ग्रँडस्लॅम स्पर्धेच्या इतिहासात पात्रता फेरीतून अंतिम फेरी गाठणाऱ्या मोजक्या खेळाडूंमध्ये तिची गणना होत आहे.

### कसोटी क्रिकेटच्या भवितव्यावर अश्विन यांची चिंता

नवी दिल्ली – भारताचा माजी फिरकीपटू रविचंद्रन अश्विन यांनी कसोटी क्रिकेटच्या भवितव्याबाबत गंभीर चिंता व्यक्त केली आहे. युवा खेळाडूंना प्रथम श्रेणी क्रिकेट आणि कसोटी क्रिकेटकडे आकर्षित करण्यासाठी अधिक प्रोत्साहन देण्याची गरज असल्याचे त्यांनी म्हटले आहे. त्यांच्या या वक्तव्यामुळे क्रिकेट विश्वात मोठी चर्चा सुरू झाली आहे.

### भारत–अफगाणिस्तान कसोटी मालिकेला सुरुवात

मुंबई – भारतीय क्रिकेट संघाने अफगाणिस्तानविरुद्धच्या एकमेव कसोटी सामन्याद्वारे नव्या हंगामाची सुरुवात केली आहे. युवा नेतृत्वाखाली खेळणाऱ्या भारतीय संघाकडे क्रिकेटप्रेमींचे लक्ष लागले असून ही मालिका आगामी आंतरराष्ट्रीय आव्हानांसाठी महत्त्वाची मानली जात आहे.

### वैभव सूर्यवंशी पुन्हा चर्चेत

मुंबई – आयपीएलमधील दमदार कामगिरीनंतर युवा फलंदाज वैभव सूर्यवंशी पुन्हा चर्चेचा विषय ठरला आहे. त्याच्या विक्रमी खेळींचा अभ्यास करण्यासाठी शैक्षणिक स्तरावर संशोधन सुरू होणार असल्याची चर्चा रंगली आहे. तसेच आगामी भारतीय संघ निवडीमध्ये त्याचे नाव आघाडीवर असल्याचे संकेत मिळत आहेत.

### सात्विक–चिराग जोडीचे आंतरराष्ट्रीय विजेतेपद

नवी दिल्ली – भारतीय बॅडमिंटनमधील अव्वल जोडी सात्विकसाईराज रंकीरेड्डी आणि चिराग शेट्टी यांनी सिंगापूर स्पर्धेत विजेतेपद पटकावत भारताचा झेंडा उंचावला. अंतिम सामन्यात त्यांनी इंडोनेशियाच्या जोडीवर मात करून आणखी एक आंतरराष्ट्रीय किताब आपल्या नावावर केला.

### बुद्धिबळात गुकेशची दमदार कामगिरी

नवी दिल्ली – जागतिक बुद्धिबळ क्षेत्रात भारताचा युवा ग्रँडमास्टर डी. गुकेश याने नॉर्वे बुद्धिबळ स्पर्धेत प्रभावी विजय मिळवत आपली विजयी घोडदौड कायम ठेवली. भारतीय बुद्धिबळातील नव्या पिढीची ताकद पुन्हा एकदा जगासमोर आली आहे.


### महाराष्ट्राच्या खेळाडूंना जागतिक स्पर्धेची संधी

मुंबई – महाराष्ट्रातील हर्ष राऊत, प्रणव गुरव आणि सुदेश्ना शिवणकर या खेळाडूंची जागतिक रिले स्पर्धेसाठी भारतीय संघात निवड झाली आहे. महाराष्ट्र ॲथलेटिक्ससाठी ही अभिमानाची बाब मानली जात असून राज्यातील खेळाडू राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर सातत्याने चमक दाखवत आहेत.

# गुन्हेगारीचा थरारक चेहरा..!

## सायबर फसवणूक, अंमली पदार्थ तस्करी, कोट्यवधींचे घोटाळे आणि मृत्यूचे सत्र..!

**नवी दिल्ली । क्राईम रिपोर्ट**
**या आठवड्यात देशभरात सायबर गुन्हे, आर्थिक फसवणूक, अंमली पदार्थ तस्करी आणि संघटित गुन्हेगारीच्या अनेक मोठ्या घटनांनी कायदा–सुव्यवस्था यंत्रणांसमोर गंभीर आव्हाने उभी केली. महाराष्ट्रासह देशातील विविध राज्यांत उघडकीस आलेल्या प्रकरणांनी नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण केले आहे.**



### नागपुरात ५२२ किलो गांजासह आंतरराज्यीय टोळी जेरबंद

नागपूर – येथे महसूल गुप्तचर संचालनालयाने (DRI) मोठी कारवाई करत ५२२ किलो गांजा जप्त केला. राष्ट्रीय महामार्गावर अडविण्यात आलेल्या ट्रकमधून सुमारे २.६१ कोटी किमतीचा गांजा सापडला. या प्रकरणी दोन आरोपींना अटक करण्यात आली असून आंतरराज्यीय अंमली पदार्थ तस्करी रॅकेटचा पर्दाफाश झाला आहे.

### ‘डिजिटल अरेस्ट’च्या नावाखाली ८७ लाखांची फसवणूक

नागपूर – सायबर गुन्हेगारांनी नागपूरमधील ८५ वर्षीय निवृत्त शासकीय कर्मचाऱ्याला ‘ईडी अधिकारी’ असल्याचे भासवून तब्बल ८७ लाखांचा गंडा घातला. व्हिडिओ कॉल, बनावट कागदपत्रे आणि अटकेची भीती दाखवून ही रक्कम विविध खात्यांत जमा करून घेतल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे.



### सायबर गुन्हेगारांचा वाढता कहर

मुंबई – गुरुग्राममध्ये ‘डिजिटल अरेस्ट’च्या नावाखाली ४२.९२ लाखांची फसवणूक करणाऱ्या टोळीतील पाच आरोपींना अटक करण्यात आली. सायबर गुन्हेगारांकडून सरकारी तपास यंत्रणांचे नाव वापरून नागरिकांना लक्ष्य करण्याचे प्रकार सातत्याने वाढत असल्याचे या प्रकरणातून स्पष्ट झाले आहे. एकूणच या आठवड्यातील घटनांमधून एक बाब प्रकर्षाने समोर आली आहे.गुन्हेगारीचे स्वरूप झपाट्याने बदलत आहे. पारंपरिक चोरी, दरोडे आणि खून यांच्याबरोबरच सायबर फसवणूक, आर्थिक घोटाळे, अंमली पदार्थांची तस्करी आणि संघटित गुन्हेगारी अधिक धोकादायक स्वरूपात पुढे येत आहेत. त्यामुळे तपास यंत्रणांसोबतच नागरिकांनीही अधिक सतर्क राहण्याची गरज निर्माण झाली आहे.




### ८०० कोटींच्या चिटफंड घोटाळ्याचे सूत्रधार अटकेत

उत्तराखंडमधील डणउउ चिटफंड घोटाळ्यात सीबीआयने मुंबईतून दोन प्रमुख आरोपींना अटक केली. या घोटाळ्यात एक लाखांहून अधिक गुंतवणूकदारांची सुमारे ८०० कोटींची फसवणूक झाल्याचा आरोप आहे. अनेक वर्षांपासून फरार असलेल्या आरोपींचा शोध अखेर लागला.



### पुणे बनावट दारू प्रकरणात मोठी कारवाई

पुणे – पुणे आणि पिंपरी–चिंचवड परिसरात विषारी दारू पिऊन २० हून अधिक जणांचा मृत्यू झालेल्या प्रकरणात सीआयडीने नवी मुंबईतून पिता–पुत्राला अटक केली. मृत्यूला कारणीभूत ठरलेल्या रासायनिक पदार्थांच्या पुरवठ्याशी त्यांचा संबंध असल्याचा आरोप आहे. या प्रकरणामुळे राज्यभरात खळबळ उडाली आहे.



### मुंबईतील सोन्याच्या व्यवहारात कोट्यवधींची फसवणूक

मुंबई – गुन्हे शाखेने सोन्याच्या व्यवहारातील २.७९ कोटींच्या फसवणूक प्रकरणात एका अंगडिया व्यावसायिकाला अटक केली. व्यवहारातील रक्कम हडप करून तक्रारदाराला जीवे मारण्याच्या धमक्या दिल्याचाही आरोप आहे. या प्रकरणात खंडणीच्या आंतरराष्ट्रीय रॅकेटचीही चौकशी सुरू आहे.



### २,९२९ कोटींच्या बँक कर्ज घोटाळ्यात मोठी अटक

मुंबई – रिलायन्स कम्युनिकेशन्स समूहाचे माजी व्यवस्थापकीय संचालक अमिताभ झुनझुनवाला यांना सीबीआयने २,९२९ कोटींच्या कथित बँक कर्ज फसवणूक प्रकरणात अटक केली. आर्थिक गुन्ह्यांच्या चौकशीत ही आठवड्यातील सर्वात मोठी कारवाई मानली जात आहे.

# शिवाजीनगर पोलिसांनी घरफोडीचा गुन्हा अवघ्या दोन तासांत केला उघड



**बीड प्रतिनिधी**
**बीड शहरातील शाहूनगर भागात बांधकाम सुरू असलेल्या ठिकाणचे कुलूप तोडून झालेल्या घरफोडीचा गुन्हा शिवाजीनगर पोलिसांनी अत्यंत तत्परतेने उघडकीस आणला आहे. गुन्हा दाखल झाल्यानंतर अवघ्या दोन तासांच्या आत आरोपीला अटक करून चोरीस गेलेला सर्व मुद्देमाल हस्तगत करण्यात पोलिसांना यश आले आहे.**

फिर्यादी सतिराम तुकाराम ढोले (रा. बीड) हे बांधकाम कंत्राटदार असून शाहूनगर भागात त्यांचे बांधकाम सुरू आहे. दि. २९/०५/२०२६ रोजी रात्रीच्या सुमारास अज्ञात चोरट्याने बांधकामाच्या साहित्यासाठी असलेल्या बंद खोलीचे कुलूप तोडून आत प्रवेश केला. खोलीत ठेवलेली लोखंड कापण्याची 'बॉश कंपनीची कट ऑफ मशीन' आणि 'इलेक्ट्रिक मशीन' असा एकूण १६,०००/– रुपये किमतीचा माल चोरून नेला होता. याप्रकरणी शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा रजि. नं. १३६/२०२६, कलम ३०५, ३३१(४) BNS प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्हा दाखल होताच प्रभारी पोलीस अधीक्षक श्रीमती चेतना तिडके, अपर अधीक्षक समीर शेख, उपविभागीय पोलिस

### आरोपीसह चोरीच्या दोन्ही मशीन जप्त

अधिकारी व्यंकट राम यांच्या मार्गदर्शनाखाली शिवाजीनगर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक शितल कुमार बल्लाळ यांनी तपासाची चक्रे फिरवली. पोलीस पथकाने गुप्त माहिती व तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे अवघ्या दोन तासांत आरोपी शेख शाहिंशाह शेख बशीर (रा. इस्लामपुरा, बीड) याला ताब्यात घेतले. त्याची कसून चौकशी केली असता त्याने गुन्ह्याची कबुली दिली असून, त्याच्याकडून चोरीस गेलेल्या दोन्ही मशीन (लोखंड कापण्याची मशीन आणि इलेक्ट्रिक मशीन) पोलिसांनी जप्त केल्या आहेत. कारवाई करणारे पोलीस पथकः सदरची धडाकेबाज कामगिरी पोलीस निरीक्षक शितल कुमार बल्लाळ यांच्या नेतृत्वाखाली पोलीस जमादार विकास रेवाळे, रवींद्र आघाव, ज्ञानेश्वर मराडे, अनिल घटमळ, बाळू रहाडे, दिलीप राठोड आणि आबेद पठाण यांनी केली आहे.पुढील तपास पोलीस जमादार विकास रेवाळे हे करत आहेत.

# स्थानिक गुन्हे शाखेचे एकाच दिवशी तीन ठिकाणी गुटखा माफीयावर छापे

**बीड । प्रतिनिधी**
**स्थानिक गुन्हे शाखेने एकाच दिवशी तीन ठिकाणी गुटखा माफीयावर छापे मारून तब्बल १२ लाख रूपया पेक्षा जास्त मुद्देमाल जप्त करून धाडसी कारवाई केली.**



दि.३१ मे २०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेने विशेष मोहीम राबवुन तीन विशेष पथके तयार करून त्यांनी पोस्टे बीड शहर, पोस्टे युसूफ वडगाव व पोस्टे सिरसाळा हद्दीतील अवैध गुटखा साठवणुक विक्री व वाहतुक करणा–या इसमाची गोपनिय माहिती काढुन पोस्टे बीड शहर हद्दीतील बसस्थानका समोर एक इसम अवैध गुटखा विक्री करण्यासाठी जवळ बाळगतांना मिळुन आला. त्याच्या ताब्यातुन २,२१,०००/– रूपयाचा गुटखा जप्त करण्यात आला. पोस्टे युसूफ वडगाव हद्दीत एक इसम त्यांच्या ताब्यातील स्वीप्ट कारमध्ये अवैध गुटखा वाहतुक करीत असतांना मिळुन आला. त्याच्या ताब्यातुन गुटखा व स्वीट कार असे एकुन ४,५०,०००/– रूपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. पोस्टे

### १२ लाख रूपयाचा मुद्देमाल जप्त

सिरसाळा हद्दीतील मौजे पोहनेर गावात एक इसम त्याच्या ताब्यातील अँटोरिक्षामध्ये गुटखा भरून त्याची विक्री करण्यासाठी घेवुन जात असतांना मिळुन आला. त्याच्या ताब्यातुन ५,४२,८००/–रूपयाचा गुटखा व टेम्पो जप्त करण्यात आला आहे. वरील तिन्ही ठिकाणी १२,१३,८००/– रूपयाचा गुटख्याचा मुद्देमाल व वाहन जप्त करून संबधीत पोस्टेला गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत. सदरची कारवाई प्र.पोलीस अधीक्षक श्रीमती चेतना तिडके, अप्पर पोलीस अधीक्षक बीड व पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पोउपनि श्रीराम खटावकर, पोउपनि महेश विघ्ने, पोउपनि सुशांत सुतळे, पोह राहुल शिंदे, पोह विकास राठोड, पोह अशोक दुबाले, पोह अर्जुन यादव, पोह महेश जोगदंड, पोह राजु पठाण, पोह दिलीप गिते, पोह बप्पा घोडके, पोह रामचंद्र केकान, पोह गोविंद भताने, पोआ सचिन आंधळे, पोअ मनोज परजणे, पोअ अश्फाक सय्यद, चापोह नितीन वडमारे, चापोह गणेश मराडे, यांनी मिळून केलेली आहे.

# परळी येथील खुनाच्या गुन्ह्याचा स्थानिक गुन्हे शाखेने ४८ तासात उलगडा करून २ आरोपी केले जेरबंद

**बीड प्रतिनिधी**
**सरदारनगर परळी वैद्यनाथ ता. परळी जि. बीड येथील इसम नामे अफजलखान उर्फ तोहीद कैरातीखान पठाण वय ३६ वर्षे हा दि.३१.०५.२०२६ रोजी त्याच्या मित्रासोबत बाहेर गावी गेला होता. परंतु तो दोन दिवस घरी आला नाही. दि. १ जून २०२६ रोजी ९.३० वाजेच्या सुमारास त्याचे प्रेत लेंडेवाडी शिवारातील रेल्वे रूळाच्या पटरीवर मिळुन आले होते. या प्रकरणातील त्याचे मित्रच असलेले दोन आरोपी स्थानिक गुन्हे शाखा पोलिसांनी अवघ्या ४८ तासाच्या आत अटक करून धाडसी कारवाई केली आहे.**

सदरील घटनेची सुरूवातीला आत्महत्या वाटत होती. परंतु घडलेल्या घटनेच्या अनुषंगाने स्थानिक गुन्हे शाखा बारकाईने तपास करीत असतांना स्थानिक गुन्हे शाखेला गुप्त बातमीदारा मार्फत व मयताचे नातेवाईकाकडुन माहिती मिळाली की, इसम नामे अफजलखान उर्फ तोहीद कैरातीखान पठाण वय ३६ वर्षे रा. सरदारनगर परळी वै.ता.परळी वै.जि.बीड याचा खुन त्याचे मित्र नामे ऋषीकेश परमेश्वर फड वय २७ वर्षे रा. सोमेश्वर नगर परळी ता. परळी जि.बीड व गौरव दिपक व्यास वय २६ वर्षे रा. स्नेहनगर परळी ता. परळी जि. बीड यांनी मिळुन केला आहे. त्यानंतर घटनास्थळाचे



आजुबाजुला असलेल्या लर्लीं फुटेज व तांत्रिक विश्लेषनाच्या आधारे तपासाचे चक्रे गतीमान करण्यात आले. दि.३.६.२०२६ रोजी नमुद आरोपीचा शोध घेतला असता सदरचे दोन्ही आरोपी हे परळी येथे आल्याची गोपनिय माहिती स्थानिक गुन्हे शाखेला प्राप्त झाली. त्यावरून स्थानिक गुन्हे शाखेचे पोउपनि सुशांत सुतळे, पोह आनंद मस्के, पोह/रामचंद्र केकान, पोह/सचिन सानप, पोह/गोविंद भताने, पोअ/सचिन आंधळे, चापोह/नितीन वडमारे यांनी सापळा रचुन नमुद आरोपीचा शोध घेवुन त्यांना शिताफीने ताब्यात घेवुन, त्याच्याकडे विचारपुस केली असता त्यांनी सांगितले की, आम्ही पैसे देणे घेणेच्या कारणावरून अफजलखान उर्फ तोहीद कैरातीखान पठाण याचा दगडाने मारून खुन करून त्याचे प्रेत लेंडेवाडी शिवारातील रेल्वे रूळावर फेकुन दिले आहे. अशी कबुली दिल्याने त्यांना ताब्यात घेवुन पोस्टे परळी ग्रामिण यांच्या ताब्यात देण्यात आले आहे. सदर गुन्ह्याचा पुढील तपास परळी ग्रामिण पोलीस करीत आहेत. सदरची कामगिरी प्रभारी पोलीस अधीक्षक श्रीमती चेतना तिडके मॅडम, सहा. पोलीस अधीक्षक ऋषीकेश शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पोनि शिवाजी बंटेवाड, पोउपनि सुशांत सुतळे, पोह/आनंद मस्के, पोह/रामचंद्र केकान, पोह/सचिन सानप, पोह/गोविंद भताने, पोअ/सचिन आंधळे, चापोह/नितीन वडमारे सर्व स्थानिक गुन्हे शाखा बीड असेंनी मिळुन केलेली आहे.

# अस्पष्ट आरोप, बेकायदेशीर नोटिसा आणि मान्यता रद्दीकरणावर न्यायालयांचा कडक चाबूक

**विशेष प्रतिनिधी । न्यायालयीन आढावा**
देशातील न्यायव्यवस्थेत या आठवड्यात सर्वोच्च न्यायालय आणि मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दिलेले काही महत्त्वपूर्ण निर्णय आणि निरीक्षणे चर्चेचा विषय ठरली. न्यायालयांनी प्रशासन, तपास यंत्रणा आणि सरकारी यंत्रणांना कायद्याच्या चौकटीत राहून काम करण्याचे स्पष्ट निर्देश देत नागरिकांच्या मूलभूत अधिकारांचे संरक्षण करण्यावर भर दिला आहे. सर्वोच्च न्यायालयाने एका २५ वर्षे जुन्या भ्रष्टाचार प्रकरणात महत्त्वपूर्ण निर्णय देताना स्पष्ट केले की, एखाद्या व्यक्तीविरुद्ध केवळ सामूहिक किंवा अस्पष्ट आरोपांच्या आधारे फौजदारी खटला चालविता येणार नाही. आरोपीची विशिष्ट भूमिका आणि त्याविरुद्ध ठोस पुरावे असणे आवश्यक असल्याचे न्यायालयाने नमूद केले. फौजदारी कायदा हा दडपशाहीचे साधन बनता कामा नये,






असेही न्यायालयाने स्पष्ट केले. न्यायदानातील विलंब कमी करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने देशातील उच्च न्यायालयांसाठी महत्त्वपूर्ण मार्गदर्शक तत्त्वे जारी केली आहेत. राखून ठेवलेला निकाल तीन महिन्यांत देण्याचा प्रयत्न करावा, तसे न झाल्यास प्रकरण मुख्य न्यायाधीशांकडे सादर करावे, असे निर्देश देण्यात आले आहेत. न्यायप्रक्रियेतील पारदर्शकता आणि गती वाढविण्याच्या दृष्टीने हा निर्णय महत्त्वाचा मानला जात आहे. छत्रपती संभाजीनगर येथील सातारा–देवळाई रस्ते रुंदीकरण प्रकरणात औरंगाबाद खंडपीठाने महापालिकेने बजावलेल्या पाडकाम नोटिसा रद्द ठरवल्या. नोटिसांमध्ये कथित अनधिकृत बांधकामाचा स्पष्ट तपशील नसल्याने आणि नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वांचे पालन न केल्याने त्या कायदेशीरदृष्ट्या त्रुटीपूर्ण असल्याचे न्यायालयाने नमूद केले. नागरिकांच्या मालमत्तेवर कारवाई करताना प्रशासनाने कायदेशीर प्रक्रिया काटेकोरपणे पाळली पाहिजे, असेही न्यायालयाने स्पष्ट केले. औरंगाबाद खंडपीठाने राज्य सरकारच्या काही शासन निर्णयांना अंतरिम स्थगिती देत सुमारे ७५० खासगी शाळांना मोठा दिलासा दिला आहे. संबंधित शाळांना योग्य सुनावणीची संधी न देता त्यांची मान्यता रद्द करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आल्याबद्दल न्यायालयाने गंभीर आक्षेप नोंदविला. नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वांचे पालन केल्याशिवाय कोणत्याही संस्थेची मान्यता रद्द करता येणार नाही, असे न्यायालयाने स्पष्ट केले. या आठवड्यातील निर्णयांमधून न्यायालयांनी तीन महत्त्वाचे संदेश दिले आहेत.प्रामुख्याने नागरिकांच्या हक्कांवर गदा आणणारी प्रशासकीय कारवाई न्यायालय सहन करणार नाही., फौजदारी खटल्यांसाठी ठोस आणि विशिष्ट पुरावे आवश्यक आहेत., न्यायदानात होणारा विलंब कमी करण्यासाठी न्यायालयीन यंत्रणेने अधिक जबाबदारीने काम करणे आवश्यक आहे., नैसर्गिक न्याय आणि कायदेशीर प्रक्रियेचे पालन ही प्रशासनाची अपरिहार्य जबाबदारी आहे.

हे पत्रक, मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक श्री वैभव विवेक स्वामी यांनी अंकिता ऑफसेट प्रिंटींग, प्लॉट नं.डी–३ एम.आय.डी.सी.बीड–४३११२२ येथे छापून साप्ताहिक शिववाणी बीड कार्यालय : क्रांती नगर, तळेकर निवास जवळ, डॉ.बारकुल हॉस्पिटलजवळ, बीड येथून प्रसिध्द केले. (सर्व वाद बीड न्यायकक्षेत)

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ANKITA OFFSET PRINTING, POLOT NO.D-3, MIDC BEED-431122 AND PUBLISHED AT. THE OFFICE OF W E E K LY SHIVVANI, BEED OFFICE : KRANTI NAGAR, NEAR TALEKAR NIWAS, NEAR DR.BARKUL HOSPITAL, BEED. (JURISDICTION AT BEED)

cmyk